म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय वा.वा.
दा. क्र. १९८२

BVBK-0401972

म. ग्रं. स. ठाणे, ...
...
क्र. ९८५२ दिनांक ५।५।
विषय बाल.
BVBK-0401972



# चांदण्या दारात आल्या

होता सात-आठ वर्षांचा गोजिरवाणा. सर्वांचा लाडका. आईबाबांचा, तसाच ताईचाही.

...ानग्या राजूचं डोकं कुठं कसं चालेल ते कुणालाच कळायचं... ला कावळ्याला किती शिकवलं म्हणजे तो कोकिळेसारखा ... लागेल, असा प्रश्न त्याला पडे अन् ' हिरव्या चोचीचा नि ...ंगाचा पोपट काय वाईट दिसेल. ' असं त्याला वाटे.

...ध्याकाळचं शाळेतनं आलं नि खेळूनबिळून झालं की दोन्ही ...वर गाल टेकवून पायरीवर एकट्यानंच बसून राहायची ... त्याला होती. लहर लागली तर तो अशा वेळी ' पिवळे ...ा ऊन कोवळे ' अशी कविता म्हणे, एखादा श्लोक म्हणे, ... नुसताच कुठेतरी टक लावून विचार करीत बसे.

असाच एका संध्याकाळी राजू आभाळाकडे
होता. आश्विनातली संध्याकाळ. गार वाऱ्याच्या
येत होत्या. गुलबक्षीची तांबडी, पांढरी, पिवळी, जांभ
शेजारीच फुलली होती. त्यांचा वास राजूच्या नाकाला जा
होता. पिवळ्या सोनेरी झेंडूची फुलंही आसपास दिम
डोलत होती.



आकाश स्वच्छ निळं होतं. राजू त्याच्याकडे टक
पाहातोय, तर बरोब्बर माडाच्या सावलीमागे एक चांदणी
लुकलुकू लागली. बघता बघता ती ठळक झाली. जणू एक

ाप्याची कळीच उमलली आभाळात! राजू आनंदानं तिच्या-
ड़े बघतोय, तर अशा कितीतरी कळ्या आभाळात पटपट
ल्या.

'काय रे, काय बघतोयस?' ताईनं तंद्रीतल्या राजूला विचारलं.

'चांदण्या. बघ, कितीतरी चांदण्या! पण किती दूर! आपल्याला काय उपयोग त्यांचा?' राजू थोडासा हिरमुसून म्हणाला.

'अहा रे वेड्या! प्रत्येक गोष्टीचा उपयोग पाहायचा असतो का रे?' म्हणत आई घरातून बाहेर आली आणि राजूला अभ्यासाला घेऊन गेली.

पण राजूच्या डोक्यातनं चांदण्या काही जाईनात. रोज संध्या-काळी गुलाबी पांढऱ्या ढगांतून डोकावणाऱ्या चांदण्यांकडे पाहात बसायचा नादच लागला त्याला.

एके दिवशी संध्याकाळी राजू असाच चांदण्याकडे बघत बसला होता. त्याचं आजूबाजूला लक्षच नव्हतं. एवढ्यात आईनं हाक मारली अन् राजूची नजर आभाळातनं खाली आली.

अन् काय आश्चर्य! समोरच्या तुळशीवृन्दावनाच्या कोनाड्यात एक चांदणी लुकलुकताना दिसली! राजूचा आपल्या डोळ्यांवर विश्वासच बसेना. त्यानं दोन्ही डोळ्यांवरनं हात फिरवून नीट निरखून पाहिलं. तुळशीवृन्दावनाच्या अंधाऱ्या कोनाड्यात समोरच्या काकूंनी पणती लावली होती.

'कसला फसलो मी!' असं म्हणत स्वतःशीच हसत राजू

घरात गेला. जाताना उगीचच लंगडी घालत गेला अन् तोंडानं म्हणत होता, 'चांदणी, चांदणी! आभाळातली चांदणी अंगणात आली.'

म्हणताम्हणता दिवाळीचा पहिला दिवस आला. राजूच्या घरात लाडू-करंज्यांची, चिवडा-चकल्यांची अन् मावश्या-काकांची ही गर्दी उसळली.

संध्याकाळ झाली. ताईनं अंगण झाडून, सडा घालून रांगोळी काढली आणि कालच नव्या आणलेल्या पणत्यांत तेल घातलं. वाती ठेवल्या. एकेक पणती लावून ती बाहेरच्या ओटयावर ठेवू लागली. अशी एक पणत्यांची रांगच तयार झाली.

फटाक्यांची ठेवरेव करण्यात गुंतलेला राजू बाहेर आला. त्यानं त्या पणत्या पाहिल्या अन् त्याचे हातपाय खेळायचे थांबले. तो एकटक त्या पणत्याकडे पाहात राहिला.

मग त्यानं एक उडी मारली. स्वत:शीच एक गिरकी घेतली अन् टाळ्या वाजवत नाचत तो म्हणायला लागला,

'आभाळातल्या चांदण्या दारात आऽल्या!
आभाळातल्या चांदण्या दारात आऽल्या!'

त्याचा नाच पाहण्यास मग सगळी गोळा झाली अन् पाहतात तो काय, खरंच त्यांनाही आभाळातल्या चांदण्या दारात आलेल्या दिसल्या. सगळीच माणसं आनंदानं हसू लागली. दिवाळीची मजा झाली!

*

२

## टंपूची जम्मत


तसं पाहिलं तर टंपूची बेटयाची चांगली चैन चाललेली असायची. गळयातल्या पट्टयातले घुंगुर खुळखुळवीत इकडून तिकडे, आईमागोमाग हिंडायचं, सकाळी उठल्याबरोबर छोटया राजूबरोबर फिरायला जायचं, आल्यावर मस्तपैकी साबण लावून आंघोळ. खायला कुरकुरीत पाव, खास बिस्किटं. मग दिवसभर भू भू करीत इकडंतिकडं हिंडायचं. राजूच्या गळयात पुढचे दोन्ही पाय टाकून लाडात यायचं. शेकहॅंड मागितला तर पंजा त्याच्या हातात ठेवायचा अन् भू भू भू असं ओरडत उगीच पळायचं.

त्या दिवशी असाच टंपू राजूबरोबर हिंडून परत येत होता. दोघेही बरेच पळाले होते. मस्त हवा पडली होती. फिरायला

फारच मजा आली होती. दारापाशी आल्यावर टंपूला सोडून राजू पुढे गेला. टंपू उगीचच रेंगाळत राहिला.

अंगणातच मनीमावशी बसली होती. झिपरू नि टिपरू तिच्या शेपटीशी, अंगावर खेळत होते. टंपू हळूच त्यांच्याजवळ गेला. म्हणाला, 'भू भू भू ! झिपरू, खेळायची का शिवाशिवी ?'

झिपरू होता आपल्याच नादात. तो म्हणाला, 'म्यांव्, म्यांव्' नुसतंच आपलं 'म्यांव्, म्यांव् !' अन् लागला आईच्या शेपटी-वरून दोरीवरच्यासारखी उडी मारायला. इतक्यात झिपरूचं नख मनीमावशीला टोचलं वाटतं. ती ओरडली, 'म्यांव् !'



टंपूला मोठीच जम्मत वाटली. 'म्यांव्–म्यांव् !' बस्स ! आपणही ओरडावं 'म्यांव् म्यांव् !' सारखं कसलं आपलं भू भू ! शी: ! त्याच्यापेक्षा 'म्याव् म्याव् !' कसं मस्त वाटतं !

म्यांव म्यांव करीतच टंपू घरात गेला. दारातच त्याची आई बसली होती. टंपूला फिरून आलेला पाहून तिनं विचारलं,

'भू भू भू – आलास का राजा फिरून ?' तशी टंपू म्हणाला, 'म्यांव म्यांव.'

अरे, असं काय बोलतोस ? कळलं नाही मला तुझं भाऊ बोलणं. नीट बोल.' आई रागावली.

पण टंपूनं ठरवलं होतं मुळी 'म्यांव म्यांव' बोलायचं. तो आपला म्यांव म्यांवच करीत राहिला.

' जळळं मेल्या लक्षण तुझं ! मला नाही वेळ तुझ्याशी खेळत बसायला. नीट नसलं बोलायचं तर हो चालता. घे रे गंप्या, तुला बिस्किट. आज टंप्याला लागलंय वेड ! ' आई फारच रागावली, तशी टंपू गेला निघून.

मागील दारी होती कोंबडीमावशी अन् तिची पिल्लं. दाणे टिपत होती सगळी मंडळी. क्लक् क्लक् करीत आईभोवती हिंडत होती. टंपू आपला त्यांची गंमत पाहात तिथंच जवळ उभा राहिला. कोंबडीमावशीला तो दिसला तशी ती पिल्लांना म्हणाली,

' पाह्यलंत का, टंपू आलाय खेळायला ! ' तशी सगळी पिल्लं क्लक् क्लक् करीत टंपूभोवती गोळा झाली.

' काय टंपू, आलास का फिरून ? ' एका पिल्लानं विचारलं. तशी टंपू म्हणाला, ' म्यांव, म्यांव ! '

' अरे, असा मांजरासारखा काय बोलतोस ? नीट बोल ना ! अंघोळबिघोळ झाली,का तुझी ? ' दुसऱ्या एका पिल्लानं विचारलं.
पण टंपू म्हणाला, ' म्यांव, म्यांव ! '

तशी सगळी पिल्लं म्हणाली की हा काही आपला टंपू नव्हे ! टंपूसारखं दिसणारं कुणीतरी मांजर आहे. ती गेली दुसरीकडे निघून.

मग टंपूही घराच्या एका बाजूला बाग होती तिथे गेला. बागेच्या कुंपणाशेजारी चरत होत्या शेळीबाई अन् त्यांची दोन करडं.

'काय टंपू, झालं का खाणंपिणं ?' शेळीमावशीनं टंपूला विचारलं. टंपूनं उत्तर दिलं, 'म्यांव म्यांव !'

'हे रे काय टंप्या असलं बोलणं तुझं ? नीट सांग पाहू, फिरायला कुठं गेला होतास सकाळचा ?'

टंपूनं सांगितलं, 'म्यांव म्यांव !'

'इश्श ! त्याच्या काय नादाला लागताय तुम्ही. आपल्या टंपू-सारखा दिसला म्हणून टंपूच वाटला होय तुम्हाला ? वेडीच आहात झालं !' शेळीबाई मुलांवर रागावल्या. तिथला पाला त्यांचा खाऊन संपलाच होता. त्या दुसरीकडे निघून गेल्या.

टंपूही तिथून निघाला. कपिलाबाईपाशी आला. त्या ताजं गवत खात उभ्या होत्या. त्यांच्यापाशीच उभे होते भुऱ्या, तांब्या अन् गोरी. टंपू आला तशी गोरी म्हणाली, 'ये रे टंपू. फार दिवसांनी आलास खेळायला ? काय म्हणतो राजू आपला ?'

टंपू म्हणाला, 'म्यांव म्यांव !'

'हे बघ, नीट बोलायचं असलं आमच्याशी, तर ये इकडे. नाही तर जा कसा घरात ! म्यांव म्यांव म्हणे ! चांगला सोन्या-सारखा कुत्रा आहे अन् बोलतो आहे कसा तर म्हणे 'म्यांव म्यांव!' कपिलामावशी चांगल्याच रागावल्या.

'अन् तू तरी ग भवाने ! तुला तरी थोडी अक्कल असायची ! तो काय टंपू वाटला होय ग तुला? टंपू काय म्यांव म्यांव ओरडतो होय ग ?' कपिलामावशी गोरीवर संतापल्या.

तशी टंपूनं ठोकली धूम. तो आला मनीमावशीकडे. मनीमावशी अन् तिची बाळं एका मोठ्या थाळीतून दूध पीत होती. मधून-मधून तोंड वर काढून मिश्या चाटत होती.

टंपूलाही आता लागली होती भूक. त्याच्या तोंडाला सुटलं पाणी. तो गेला मनीमावशीजवळ अन् म्हणाला, 'म्यांव !'

मनीमावशीनं दचकून त्याच्याकडे पाह्यलं. तिला दिसला टंपू समोर.

'काय रे टंपू, काय हवंय तुला ? झालं ना बिस्किट फिस्किट खाऊन ? तशी टंपू म्हणाला, 'म्यांव म्यांव!'

'चल मेल्या ! असलं कसलं हे मांजर ? कुत्र्यासारखं ! हाड्हाड् !' मनीमावशी ओरडली अन् टंपूच्या मागेच लागली. तशी टंपूनं काढला पळ अन् गेला आईपाशी.

आई अन् गंपू बसली होती बिस्किटं खात. कसा छान कडम् कुडूम आवाज येत होता ! टंपू टक लावून पाहात उभा राहिला अन् मग हळूच म्हणाला.

'म्यांव ! ए आई, मला दे ना एक बिस्किट. एकच. म्यांव !' जळ्ळं मेलं लक्षण तुझं ! हे असलं कसलं कुत्रं आलंय मांजरासारखं ! छुत् छुत् ! टंपूची आई ओरडली. तशी टंपू आपला दूर जाऊन उभा राहिला.

'कडम् कुडुम्, कर्रम कर्रम !' बिस्किटांचा आवाज येत राहिला. गंप्या आपला बिस्किटं खात होता. एक दोन तीन ! अन् आईसुद्धा ! अन् टंपूला मात्र कुणी काही देत नव्हतं !

टंपूला खरंच रडायला यायला लागलं. तो आपला कुई कुई करून रडायला लागला.

'सगळीजणं आपली बिस्किटं हाणताहेत, नि आम्ही मात्र उपाशी ! का तर आम्ही 'म्यांव म्यांव' ओरडतो म्हणून ! कोणी आम्हाला काही खायला देऊ नका! भू भू भू !

टंपू रडत रडत बोलायला लागला. 'म्यांव म्यांव' करायचं विसरून भू भू भू भूच म्हणायला लागला खरंखुरं !

'इश्श्य ! हा तर टंपूच की आपला ! गेलं वाटतं वेड टाळक्यातलं ! चांगलं भू भू भू करायचं सोडून म्यांव म्यांव म्हणत होता ते! मला वाटलं खरंच हे टंपूसारखं दिसणारं मांजरच आहे अन् टंपू गेलाय राजूबरोबर फिरायला ! ये बाबा, घर बिस्किट. कशी छान कुडकुडीत आहेत बघ !'

आईनं टंपूला बिस्किटं दिली. एक, दोन, तीन. हवी तेवढी ! तशी टंपूला मनापासून हसायला आलं. बिस्किटं खाऊन तो मुळी ओरडतच फिरायला लागला अंगणातून भू भू, भू भू ऽ ऽ !

तशी मनीमावशी, शेळीमावशी कोंबडीमावशी अन् कपिलामावशी म्हणाल्या 'अरे हा तर टंपू ! आला तरी केव्हा फिरून ? अन् मघाचं टंपूसारखं दिसणारं मांजर गेलं कुठे ?'

आता ते म्यांव म्यांव करणारं, अगदी टंपूसारखं दिसणारं मांजर गेलं कुठं, हे एक टंपूला माहीत, की मला माहीत ! आहे की नाही आपली जम्मत ?

*

२

## नंदूची पुस्तकं

नंदू आज भलता म्हणजे भलताच खुशीत होता. कारण होय ? वार्षिक परीक्षा संपली होती ! अभ्यास करकरून नंदूच्या डोक्याचा इतका भुगा झाला होता की कधीकाळी वार्षिक परीक्षा संपेलसुद्धा यावर त्याचा विश्वास बसत नव्हता !

पण ती संपली होती ! शप्पथ! शेवटचा पेपर देऊन घरी येऊन नंदू राक्षसासारखा जेवला होता. मग भर बाराच्या उन्हात संजूबरोबर क्रिकेट खेळून दोन तांबे गार पाणी ढसाढसा प्यायला होता आणि नंतर ' भूक भूक ' करीत आईच्याभोवती नाचून त्यानं आईकडून गोड सांजा करून घेतला होता. तो जेमतेम चारच वाट्या आईनं खाऊ दिला होता. तो खाऊन नंदू हातात कॉमिक घेऊन आरामशीर वाचत पडला होता. वाचतावाचता हाता-पायाचे चाळे चालले होते.

करता करता नंदूचा पाय पिशवीसारख्या वस्तूला लागला. नंदूनं मान वळवून पाहिलं तर अरे बापरे! तो तर होता नंदूचा एनिमी नंबर वन्! नंदूचं दप्तर होतं ते! गणित, इंग्रजी, हिंदी असल्या विषारी पुस्तकांना पोटात वागवणारं.

झालं! नदूचं टक्कुरं फिरलं. काय करावं म्हणजे ही दुष्ट पुस्तकं कंप्लीटली दिसेनाशी होतील याचा विचार तो करू लागला. दप्तर माळ्यावर टाकावं? पण तिथूनही ते दिसणारच. भिकाऱ्याला देऊन टाकावं? आख्खंच्या आख्खं? तसं करतानाच



आईचे पाच धपाटे बसतील! पलीकडच्या विहिरीत नेऊन टाकावं? पण बेटं तरंगून वर आलं तर तुकारामाच्या गाथेसारखं?

काय करावं याचा विचार चालू असतानाच नंदूला युक्ती सुचली. तो झटकन उठला. त्यानं फावडं घेतलं आणि मागच्या अंगणातल्या बागेत खोलखोल खड्डा खणायला सुरुवात केली. त्याची चाहूल ऐकताच आईनं झोपेतनं डोळे उघडून त्याच्याकडे पाहिलं. पोरगं किती वाईट असलं तरी अधूनमधून चांगली कामंही करतं बर का अशा समाधानात ती झोपून गेली.

इकडे नंदूनं खोलखोल खड्डा खणला. हलक्या पायानं आत येऊन दप्तर अंगणात नेलं आणि ....... आणि त्या खड्ड्यात पुरून टाकलं! त्याच्यावर भसाभसा माती टाकली. कोणी ओळखू नये म्हणून त्या मातीवर मूठभर धने चुरडून फेकून दिले. उन्हाळाभर नंदूच्या आईला छान कोथिंबीर मिळाली.

दृष्टिआड ते मनाआड. नंदूचं दप्तर असं दृष्टिआड गेल्यानं त्याचा विचारही कुणाला शिवला नाही. ती दुष्ट पुस्तकं दिसेनाशी झाल्यामुळे नंदूचीही उन्हाळ्याची सुट्टी मस्त जाऊ लागली. आइस्क्रीम, उसाचा रस इ. इ.

मे महिना संपत आला. पुन्हा शाळा सुरू व्हायचे दिवस आले. आभाळात वळवाचे ढग जमून यायला लागले. संध्याकाळचे वादळी पाऊस पडू लागले.

असे दोनतीन झकास पाऊस पडून गेल्यावर एक दिवस नंदू बागेत गेला. बागेतली तऱ्हेतऱ्हेची झाडं पाहून झाल्यावर त्याचं लक्ष त्यानं लावलेल्या कोथिंबिरीकडे गेलं आणि तो दचकलाच. कोथिंबिरीच्या मध्यभागी एक जाडजूड कोंब आला होता! त्या कोंबाला पानं कसली होती? अरे बापरे! अद्भुत! त्या कोंबाला पानं आली होती पुस्तकांची!

नदून चांगलं चारसहादा मुंडकं हलवलं, डोळ्यांवरून हात फिरविले आणि काहीच न कळून तो खेळायला निघून गेला.

दोनचार दिवस असेच गेले. एके दिवशी सकाळचाच नंदू बागेत गेला. त्यानं भीतभीतच कोथिंबिरीच्या वाफ्याकडं पाहिलं.

तो कोंब आता चांगलाच वाढला होता. त्याला पुष्कळ फांद्या फुटल्या होत्या आणि एकेका फांदीला एकेक पुस्तक फुटलं होतं. इंग्रजी, गणित, हिंदी, इतिहास, असलं.

नंदूनं मुकाट्यानं ती पुस्तकं तोडली, दप्तरात भरली आणि तो शाळेच्या नव्या वर्षाच्या पहिल्या दिवसासाठी शाळेत हजर झाला !

दा. क्र. १९८२ दिनांक ८।५।
विषय क्र.



# आमच्या आईचं ( न ) हरवलेलं पेन

आमच्या आईच्या सगळ्याच वस्तूंना एक वाईट खोड आहे. नेमकं त्या वस्तू हव्या असतील अशावेळी हरवायची. आणि मग त्या न हरवलेल्या वस्तू शोधून देण्याच्या कामगिरीवर माझी नेमणूक होते. माझ्यानं ते काम न झाल्यास दादा, ताई, बाबा, मोलकरीण, घरात हिंडणाऱ्या चिमण्या, मनूताई साऱ्यांना मिळून ती वस्तू शोधून काढावीच लागते.

काल असंच झालं. मातोश्रींना आली मावशीबाईंना पत्र पाठवायची लहर. फार दिवसांत खुशालीचं कार्डदेखील न टाकल्यानं आईला फार अपराधी वाटायला लागलं होतं. अन् त्या अपराधाचं परिमार्जन करायला ताबडतोब पत्र लिहायलाच हवं होतं. पत्र म्हणजे कार्ड हो. त्यातदेखील चार ओळी 'तुम्ही खुशाल आम्ही खुशाल ' अशा.

आता आईचं ताबडतोब म्हणजे ताबडतोब, त्या मिनिटाला. आणि थोडीशी शोधाशोध केल्यावर कार्ड जरी सापडलं तरी पेन काही सापडेना. झाऽलं. माझ्या छातीत धस्स झालं. आता बाई-साहेबांचं पेन सापडून देण्याचं काम माझ्यावर येणार या कल्पनेनंच मी अर्धमेला झालो. पटकन चपला घालून बाहेर पळ काढणार, एवढ्यात मातोश्रींची मधुर आज्ञा कानी पडली, ' बंड्याऽ, तेवढं माझं पेन बघ रे कुठं दिसतं का ते ! '



आता तुम्ही म्हणाल की हात्तिच्या, आईला पेन हवं होतं तर आपलं पेन द्यायचं अन् लिही म्हणायचं पत्र. पण हा उपाय आईला मानवत नाही ना! तिला पेन म्हणजे स्वत:चंच हवं. कंगवा, रुमाल सारं स्वत:चंच हवं. एवढंच काय, कुठं दहा पैशाचं नाणं हरवलं तरी तेच, पहिलंच हवं !

मग काय, लागलो झालं मी पेन शोधायला. आता या बाईला लागणार चार महिन्यांनी एकदा पेन. ते कशाला सहज सापडतंय? पर्स, टेबल, आरशाचं कपाट, खिडक्या, माझं दप्तर, साऽऽरं शोधलं. पण पेन काही सापडेना.

मग माझी दया येऊन दादा आला मदतीला. ताई गेली होती बाहेर म्हणून सुटली. बाबा मात्र सापडले पेनच्या कचाट्यात. सगळं घर उलथंपालथं केलं आम्ही. सगळ्यांच्या सगळ्या बुश-कोटांचे नि पँटींचे खिसे तपासले. कपाटं, केराचे कोपरे —— वेड लागल्यासारखं आम्ही सगळं धुंडाळत राहिलो. पण पेन काही सापडेना !

शेवटी आम्ही सारे दमलो. घामाच्या धारा वाहू लागल्या. बाबा मटकन् खुर्चीत बसले अन् आईला म्हणाले, ' आता चहा दे थोडा म्हणजे जोर येईल पुन्हा शोध घ्यायला. '

' हो तुम्हाला काहीतरी निमित्तच हवं असतं चहा घ्यायला ! ' असं पुटपुटत आई चहा करायला स्वंयपाकघरात निघून गेली.

' बंड्या ऽ, चिवड्याचा डबा आण पाहू. चहाच्या आधी चिवडा खाऊ या थोडा. ' बाबा म्हणाले, मी धावत जाऊन चिवड्याचा डबा आणला. आम्ही तिघंही फक्वया मारायला लागलो.

जरा जास्त दाणे मिळावेत म्हणून मी चिवड्याच्या डब्यात अगदी तळाशी हात घातला आणि... आणि माझ्या हाताला कायससं लागलं. मी टाणकन् उडी मारून म्हटलं, ' पेन सापडलं ! चिवड्याच्या डब्यात ? ' बाबांनी कपाळावर हात मारून घेतला.

' हो ऽ, परवा मालूवन्सं आल्या होत्या तेव्हा पेन होतं माझ्या हातात, परटाची यादी करायला. त्यांना चिवडा देता देता... ' मातोश्री म्हणाल्या.

यावर कोपरापासून हात जोडण्याखेरीज काय करणार आपण ?

❋

५

# पिंटूची खेळणी रुसली

पिंटू नावाचा एक छोटासा मुलगा होता. खेळकर आणि मस्तीखोर! तो त्याच्या बाबांचा फार लाडका होता. बाबांनी त्याला खूप खेळणी आणून दिली होती. सोंड हलविणारा हत्ती, उड्या मारणारा ससा, झ्झुं–ऑ–क् करून जाणारी मोटार, मोठ्या मोठ्या डोळ्यांची, डुगुडुगु हालणारी बाहुली, भो भो करून अंगावर उड्या मारणारा कुत्रा अन् ठोकळे तर कितीतरी! शिवाय चेंडू, बॅटी, फुलं, दोऱ्या –अरे बापरे! किती म्हणून खेळ होता सांगू पिंटूचा!

पण पिंटू काय करी, दिवसभर खेळ घेऊन खेळे अन् जिथला खेळ तिथंच टाकून देई. म्हणजे आपली अंघोळ घालायला बाथरूममध्ये नेलेला भू भू बाथरूममध्येच राहून जाई. बाबांच्या लिहायच्या टेबलावर हत्ती बसून राही. बाहुली बसे खिडकीत.

एखादा चेंडू राही तांदळाच्या डब्यात. ससा बसे आजोबांच्या गादीवर. ठोकळे तर पसरलेले असत घरभर.

असा असे पिंटूचा खेळ. त्याची आई तो एकदा आवरी, दोनदा आवरी, पण पुन्हा पिंटूनं तो खेळायला घेतला की पहिल्यासारखी वेळ येई – जिथल्या तिथंच सगळं राहून जाई. घरात खेळण्यांचा नुसता पसाराच होऊन जाई.



एके दिवशी आई पिंटूला म्हणाली, 'पिंटोबा, मी बसतेय आता लाडू करायला तुमच्यासाठी. तुम्ही आता आपला सगळा खेळ आवरून ठेवा पाहू ! माझे लाडू झाले की सगळं घर मला स्वच्छ दिसलं पाहिजे. काय ऐकलं का ? नाहीतर लाडू मिळतील पाठीत ! '

पिंटू म्हणाला, 'हो आवरतो ग खेळ.' कारण पिंटूला लाडू फार आवडायचे. मग आई बसली स्वयंपाकघरात लाडू करीत. पिंटूनं एकदोन ठोकळे नेऊन त्याच्या कपाटात ठेवलेसुद्धा. पण मध्येच त्याला दिसली एक छोटीशी काठी. त्यानं ती उचलली आणि गेला तो अंगणात. एका कोपऱ्यात बसला विहीर खणत. आणि खेळ आवरायचं मुळी तो विसरूनच गेला. टेबलावरचा हत्ती

टेबलावरच राहिला, खिडकीतली बाहुली, गादीवरचा ससा, बाथरूममधला भू भू ... सगळी मंडळी राहिली जिथल्या तिथंच! आणि पिंटू बसला खेळत अंगणात. आईनं खेळ आवरायला सांगितलं होतं त्याची मुळी त्याला आठवणच राहिली नाही.

तशी टेबलावरच्या हत्तीला वाटलं, की आता जर पिंटूची आई आली आणि तिनं सगळा खेळ घरभर पसरलेला पाहिला तर बसेल पिंटूला मार. पिंटू लागेल रडायला. पण पिंटू तर आपला दोस्त! मग त्याला मार बसून कसं चालेल? आता काय करायचं? तितक्यात त्याला दिसली खिडकीतली बाहुली. तिच्याही मनात हत्तीसारखंच येत होतं. पिंटूला मार बसणार म्हणून तिच्या डोळ्यातनं पाणी यायला लागणार होतं. तेवढ्यात हत्तीची हाक तिला ऐकायला आली, 'भावले, ए भावले!'

'काय रे हत्तीदादा?' बाहुलीनं विचारलं.

'पाहिलंस ना काय झालं ते? पिंटू आपल्याला विसरूनसुद्धा गेला. आता लाडू झाले की त्याची आई येईल' —

'अन् पसारा दिसला की....' बाहुलीला पुढं बोलताच येईना इतकं वाईट वाटायला लागलं तिला.

'मग आता ग काय करायचं?' हत्तीनं घाबरून विचारलं.
'काय करायचं?' बाहुलीला देखील काहीच सुचेना.

'असं करू या का रे आपण?' स्टुलावरचा बंदूकवाला शिपाई विचारायला लागला, 'आपणच जाऊन बसू या कपाटात, म्हणजे पिंटूच्या आईला वाटेल, पिंटूनंच पसारा आवरला म्हणून! मग काही ती त्याला मारणार नाही.'

'पण जायचं कसं?' हत्तीनं विचारलं.

'जाऊ तसंच हळूहळू !' बाहुली म्हणाली.

'पण सशाला, भूभूला–सगळ्यांना घ्यायला पाहिजे बरोबर!' पोलिसदादा म्हणाला.

'चला ना जाऊ या ! ' बाहुली म्हणाली. तिनं बुदकन् खाली उडी मारली नि ती डुगडुगु चालायला लागली. हत्तीदादाही आपल्या चाकावरनं चालायला लागले. शिपाईदादा बुटांचे पाय ऐटीत टाकून निघाले. मग त्यांनी बाथरूममधल्या भूभूला, गादी-वरच्या सशाला, डब्यातल्या चेंडूला – सगळ्यांना बरोबर घेतलं. ठोकळेसुद्धा बिचारे तुडुकतुडुक उड्या मारीत गेले अन् सगळा खेळ पिंटूच्या कपाटात जाऊन बसला. आता पिंटूला मार बसणार नाही म्हणून त्यांना फार आनंद झाला. हत्तीला, बाहुलीला – सगळ्यांना हसायला यायला लागलं. इकडे पिंटू मात्र बसला होता अंगणात खेळत.

इतक्यात पिंटूच्या आईचे लाडू करून झाले. आणि ती गेली पिंटूच्या कपाटापाशी. बघते तर काय ? सगळी खेळणी आपली व्यवस्थित जागच्याजागी बसलेली ! तिला फार कौतुक वाटलं. तिनं पिंटूला हाक मारली. तशी पिंटू अंगणातून धावतधावत आईजवळ आला. त्याच्या पाठीवरनं हात फिरवत आई म्हणाली, 'अरे, आवरलास तरी केव्हा खेळ ? अन् किती छान ठेवलास ! '

पिंटू म्हणाला, 'हट्, मी नाही आवरला खेळ. तूच आवरला असशील – '

आई म्हणाली, ' वावा ! तूही आवरला नाहीस मीही आवरला नाही. मग काय खेळ आपल्या पायानं चालत गेला वाटतं ? तूच

आवरलास, होय ना ? असा रोज ठेवलास तर किती छान होईल. बरं, चल आता लाडू खायला.'

पिंटू गेला हसत हसत लाडू खायला, पण इकडे हत्ती नि बाहुली, ससा नि कुत्रा, सगळीच त्याच्यावर रागावली. म्हणायला लागली, 'आम्ही सगळी इकडं कपाटात येऊन बसलो पिंटूला मार बसू नये म्हणून. पण पिंटूनं काही शाबासकीसुद्धा दिली नाही. असला कसला हा पिंटू ? आम्हाला वाटेल तसं टाकतो. आपण नाही आता त्याच्याशी खेळायचं !'

अन् मग त्यांनी ठरवलं की पिंटू झोपला की आपण आपलं बाहेरच निघून जायचं. अन् मग रात्री पिंटू झोपला. पिंटूची आई आणि बाबा पण झोपले. तशी एकेक, एकेक खेळण्यानं खिडकी-तून उडी टाकली बाहेर. सगळी खेळणी आपली जाऊन बसली बागेच्या एका कोपऱ्यात. आपली रातभर तिथंच बसून राहिली.

सकाळ झाली. पिंटू उठला. तोंड धुऊन कोको घ्यायला बसला. एकदम त्याला मोत्याची आठवण झाली. कारण कोको पिताना त्याला शेजारी मोत्या असायला लागे. कोको तसाच ठेवून तो धावत धावत खेळण्यांच्या कपाटापाशी गेला. बघतो तर काय ! मोत्या तर नाहीच, पण हत्तीही नाही, मोठमोठ्या डोळ्यांची डुगुडुगु हलणारी बाहुलीही नाही, टुणटुण् उडणारा ससाही नाही, कोणीच नाही. कपाट आपलं रिकामं !

मग पिंटू लागला रडायला. चांगला हा एवढा गळा काढून ! तशी त्याची आई आली धावतच. 'काय रे पिंटू, रडायला काय झालं सकाळच्या वेळी ?'

'अुं अुं अुं ! माझा खेळ – माझा सगळा खेळ कुठाय – – अुं अुं अुं!' पिंटूला धड बोलतासुद्धा येईना.

‘ अरे म्हणजे काय, कालच ना तू सगळा खेळ कपाटात ठेवला होतास ?’ आईनं विचारलं.

‘ पण तो कपाटात आता नाहीय् ! हत्ती नाही, बाहुली नाही, ससा नाही, मोत्यासुद्धा नाही. हांऽऽऽ पिंटू आणखीनंच मोठ्यानं रडायला लागला.

‘ अरे नसला तर नसू देत. कोको पिताना खेळ रे कशाला हवा तुला ? कोको पी मुकाट्यानं. वाटेल तसा टाकतोस तू खेळण्यांना. म्हणून मग गेली असतील ती कुठंतरी. पण रडू नकोस तू आत्ता. मला नाहीय् वेळ तुझी समजूत घालत बसायला ’ असं बोलली अन् आई निघून गेली.

पण पिंटूला फारच वाईट वाटायला लागलं. तो आपल्या खेळण्यांना हाका मारायला लागला, ‘ एऽ हत्तीदादा, ए बाहुली-ताई, ससोबा, अे मोत्या – अरे याना माझ्याशी खेळायला.... कुठं गेला तुम्ही सगळी ? तुम्ही रागावलात का माझ्यावर ? आता मी नाही तुम्हाला हवा तसा टाकणार. तुम्ही सगळी या. लौकर लौकर या. आपण खूपखूप खेळूया... ’

पिंटूच्या हाका बागेतल्या खेळण्यांना ऐकू आल्या. पिंटूशी खेळायला मिळणार म्हणून त्यांना फार आनंद झाला. पिंटूनं नीट ठेवायचं कबूल केलं म्हणून त्यांचा राग कुठच्या कुठं निघून गेला. मग भराभर सगळी धावत आली. हत्ती, बाहुली, ससा, मोत्या आणि गुपचूप कपाटात जाऊन उभी राहिली– हसतहसत, पिंटू केव्हा येतो अन् आपल्याला खेळायला नेतो त्याची वाट बघत !

‘ इश्श, हे रे काय पिंटू तुझं ? सगळा खेळ तर कपाटात आहे तुझा. अन् उगीचच कशाला रडलास मघाशी ?’ पिंटूची

आई एकदम पिंटूला म्हणाली. पिंटू रडला, सगळी खेळणी कुठं-तरी गेली म्हणाला म्हणून ती कामातनं वेळ झाल्यावर पिंटूच्या कपाटापाशी जाऊन बघून आली. सगळा खेळ तर तिला जागच्या जागी दिसला. आईचं बोलणं ऐकल्याबरोबर पिंटूनं टुणकन् उडीच मारली अन् धावतधावत तो कपाटापाशी गेला. बघतो तर खरंच, त्याची सगळी मित्रमंडळी तिथं हजर ! त्याला फार आनंद झाला.

मग मोत्याला बरोबर घेऊन पिंटूनं कोको पटकन् पिऊन टाकला. अन् दिवसभर सगळ्या खेळण्यांशी खेळत बसला. हत्तीच्या पाठीवरनं त्यानं सगळ्यांना फिरवून आणलं. ठोक-ळ्यांची घरं केली, सशाबरोबर टणाटणा उड्या मारल्या. अन्-चेंडूबरोबर सगळ्या अंगणभर धावला. सगळी खेळणी अगदी खूष झाली. पिंटू तर सारखा हसत होता. मजेत येऊन आरडाओरडा करीत होता. फारच गंमत आली खेळात.

पण रात्री निजायच्या आधी सगळी खेळणी नीट कपाटात ठेवायला तो विसरला नाही हं ! हो, उगीच आपलं कुणी हत्ती-बित्तीनं, सशाबिशानं, रुसायला नको न् रुसून कोपऱ्यात जाऊन बसायला नको म्हणून !

६

# चंद्राला आला कंटाळा

एकदा चंद्राला आला कंटाळा. खूप म्हणजे खूपच कंटाळा आला त्याला. तो रडतरडत आईकडे गेला. आईला म्हणाला,

'मी नाही उगवणार जा उद्यापास्नं!'

आईनं त्याला जवळ घेतलं. निळ्यानिळ्या पदरानं त्याचे डोळे पुसले अन् म्हणाली ;

'का रे बाबा, का नाही उगवणार तू उद्यापास्नं?'


'नाही जा उगवणार. मला कंटाळा आलाय अगदी!' चंद्र मुसमुसत म्हणाला.

'का रे, कंटाळा का आला तुला एवढा?' त्याच्या आईनं विचारलं.

'तर काय? बाकीच्या साऱ्यांनी झोपायचं अन् आम्ही मात्र

उगवायचं. एकट्यानं आकाशात ताटकळायचं. हीऽऽ एवढी लांऽऽब वाट चालायची रोज. आम्ही नाही जा!' चंद्र चांगलाच चिडला होता.

'अरे, पण एकट्यानं कशानं? एवढ्या चांगल्या चांदण्या असतात ना तुझ्याबरोबर? अन् कधी कधी ढगदेखील असतात की सोबतीला!' चंद्राच्या आईनं समजूत घातली.



'हो! म्हणे चांदण्या अन् ढग! करायचेत काय ते? ते काय एक शब्द बोलतात? का गाणी म्हणतात? ढग आल्यावर थंडी मात्र वाजते उलटी! दादाचं आपलं बरं आहे. तो उगवला की पाखरं गाणी गायला लागतात, अगदी उंच उंच उडून त्याला सोबत करतात. माणसं हसतात, बोलतात, नाचतात. झाडं डुलतात, फुलं फुलतात दादाला पाहून! आम्ही उगवलो म्हणजे मात्र सगळे झोपलेले. पाखरं, माणसं, फुलं सगळी गपचुप! अन् आम्ही आपले चालतोय चालतोय एकटेच मुकाट्यानं! छे,

उद्यापासनं मी मुळीच उगवणार नाही जा!' चंद्रानं ठासून सांगितलं. किती सांगितलं तरी त्याची समजूत पटेचना.

आता काय करायचं? काय उपाय करायचा? चंद्राची आई विचारात पडली. मग शेवटी सूर्याला म्हणाली, 'हे बघ सूर्यराजा, चंद्राला आलाय कंटाळा. मी खूप समजूत घातली, पण तो काही ऐकत नाहीये. उगवणारच नाही म्हणतो उद्यापासनं. पण तसं केलं तर माणसांना उजेड कसा मिळणार रात्रीचा? तर तू आपला उद्या मावळूच नकोस. तूच राहा आभाळात – दिवसाचा अन् रात्रीचाही!'

सूर्य विचारा पडला दादा. त्याला आईचं ऐकणं भागच होतं. तो बरं म्हणाला. तो जो दुसऱ्या दिवशी उगवला तो मावळलाच नाही. पश्चिमेच्या डोंगराला टेकून उभाच राहिला.

झालं, लोक पाहातच राहिले. आता सूर्य मावळेल, मग रात्र होईल, मग अंधार पडला की आपण झोपू, असं ते म्हणत होते. पण रात्र झालीच नाही. लोकांना झोप येईचना.

तेच पाखरांचं झालं. रात्र झाली की आपापल्या घरट्यांतनं झोपायची ती. पण आज त्यांना झोपच येईना. किलबिलून किलबिलून त्याचे घसे दुखून गेले. भिरभिरून भिरभिरून पंख थकून गेले.

रात्र होईना म्हणून फुलांनाही कोमेजता येईना. रात्री उमलणाऱ्या फुलांना उमलता येईना. त्यांचा सुगंध सुटेना.

चंद्रावर जायला तयार होऊन बसलेल्या अंतराळवीरांनाही आता काय करायचं ते सुचेना.

सूर्य आपला तारकळत आकाशात होता आणि पृथ्वीवरची

माणसं, जनावरं, पाखरं तारवटून उघड्या डोळ्यांनी वावरत होती.

असे कितीतरी दिवस गेले. झोप नसल्यानं पृथ्वीवरच्या साऱ्यांना वेड लागायची वेळ आली आणि सूर्याचे पाय उभं राहून राहून तुटून पडतील की कायसं त्याला वाटायला लागलं.

एव्हाना चंद्राचाही कंटाळा गेला असेल असं त्याच्या आईला वाटलं. ती त्याला घेऊन आली. तिनं त्याला पृथ्वीवरच्या साऱ्यांची दैना दाखविली, त्याच्या गरीब बिचाऱ्या दादाची दुर्दशा दाखविली.

चंद्राला त्यावेळी कंटाळा आला असला तरी तो मनाने प्रेमळ होता. आपल्या हट्टामुळे सगळ्यांना त्रास झालेला पाहून त्याच्या डोळ्यांतनं पाणी ओघळलं. तो आईला म्हणाला, 'आई, मी उद्यापास्नं उगवेन. किंवा आत्ताच सांग दादाला मावळायला. मी आत्ताच उगवतो!'

'शाणा माझा राजा तो. तुला कंटाळा येतो ना उगवायचा, मग तू रोज थोडा थोडाच उगवत जा. केव्हा तरी एकदा पुरता उगवत जा आणि एकदा अगदी पुरती सुट्टी घेत जा!' आईनं चंद्राच्या गोलगोल गालावरनं हात फिरवीत सांगितलं.

'बऽरं' म्हणून हसत चंद्र उगवला, तशी सूर्य मावळला. पृथ्वीवरची माणसं सगळी शांत झाली, हसतहसत झोपी गेली. पाखरंही गात गात घरट्यात गेली, गेल्या गेल्या त्यांना झोप लागली.

गोष्ट ऐकणाऱ्या राजूलाही छानशी झोप आली. त्याच्याकडे पाहाता पाहाता चंद्राचा कंटाळा पार निघून गेला.

*

७

# नितिनचं नवं दप्तर


आमचा नितिन थोडासा – थोडास्साच हं, अगदी माशीच्या पंखाएवढा हट्टी आहे. तसं कोण हट्टी नसतं हो? परवा वाढदिवसाला बाजा, चित्रांचं पुस्तक, कॅडबरी आणि सर्कस कुणी-कुणी कशी मिळविली हे काय मला माहीत नाही? पण ही सगळी चूक मोठ्या माणसांचीच की नाही? हट्ट केल्याखेरीज बेटी लहान मुलांना काही देतच नाहीत!

तर नितिनं हट्ट धरला की नवं दप्तर पाहिजे. शाळेचं वर्ष संपायला अगदी दोनच महिने राहिले असताना. त्याचं पहिलं दप्तर फाटलं होतं असंही नव्हे. ते होतं छान लाल लाल. त्याच्या-वर एक हती काढला होता. तो पुस्तक वाचत होता. आणि खाली मोठ्या अक्षरांत इंग्रजीत हत्तीचं नाव लिहिलं होतं ज–म्बो!

तेही दप्तर नितिनला आवडल्यामुळेच घेतलं होतं. पण आता त्याला त्याचा कंटाळा आला होता.

पण आईचं म्हणणं, 'अरे, आणखी दोनच महिने वापर हे दप्तर. पुढच्या वर्षी आणू ना नवं तुला !'

पण छे, नितिनला आताच्या आत्ता नवं दप्तर हवं होतं. शेजारच्या राजूसारखं. खाकी, पाठीवरनं घ्यायचे बंद असलेलं !



पण या वेळेला मोठी माणसं फारच हट्टाला पेटली. आई तर ऐकेनाच, पण हातपाय आपटून डोळ्यांत पाणी आणलं तरी बाबाही नितिनची बाजू घेईनात. दादिटल्यानं दोन सणसणीत धपाटे घातलेन् आणि ताईही चिडल्यासारखी झाली.

मग नितिननं काय केलं, ते लाल, त्याला न आवडणारं दप्तर रिकामं केलं. ताईनं शिवलेल्या फुलाफुलांच्या कापडाच्या पिशवीत पुस्तकं आणि वह्या भरल्या आणि ते दप्तर दिलं माडीवर टाकून, गोदरेजच्या कपाटावर ! ती पिशवी घेऊनच तो शाळेत जायला लागला. विच्चारा !

इतक्यात काय झालं ? जानेवारीतली थंडी संपून उन्हाळा सुरू झाला. उन्हाबरोबरच घरात दिवसभर चिमण्यांचा फरफराट सुरू झाला.

फर्रऽऽ इकडून ये, गवताची काडी आण. 'सर्रऽऽ' तिकडून ये, सुतळीचा लांबलचक धागा आण. त्याबरोबर चिवचिवाट, भांडणं, चोचीनी मारामाऱ्या ! असं सगळं रोजच्या रोज चालू झालं. मोठ्या माणसांची डोकी अगदी पिकून गेली. काठी घेऊन चिमण्यांच्या मागं लागून नितिन अगदी वैतागून गेला.

पण काही दिवसांतच तो कलकलाट, तो फरफराट थांबला.

आणि एके दिवशी कशी काय जाणे, आईला नितिनच्या दप्तराची आठवण झाली. उठल्या उठल्याच ती नितीनला म्हणाली, 'नितिन ते दप्तर कुठंय तुझं ? पिशवीतनं पुस्तकं नेतोस. बाई रागवत नाही' का ? चल, शोधून काढ ते दप्तर.'

'माडीवर आहे ते. गोदरेजच्या कपाटावरच.' नितिननं तश्शाच आवाजात सांगितलं.

'चल, मी देतो काढून' दादा म्हणाला.

मग दादा आणि नितिन माडीवर गेले. कपाटावर पाहू लागले तर दप्तरावर हाऽऽ गवताचा, काड्यांचा ढीग ! तसंच खुर्चीवर चढून दादानं दप्तर काढलं तर काय ?

आतून चिव चिव चिव चिव असे कोवळे-कोवळे आवाज !

'अरे चिमणीची पिलं! चिमणीनं घरटं केलं तुझ्या दप्तरात अन् पिल्लंही घातली ! ' दादा ओरडला, हळूच दप्तर खाली घेऊन आला आणि आईला ते त्यानं दाखविलं.

'काढून टाकू घरटं ?' दादानं आईला विचारलं.

'नको रे ! किती लहान लहान आहेत पिल्लं ! जा, होतं तिथं ठेवून दे. त्या गाढवालाच नवं दप्तर आणून दे ! ' आई म्हणाली.

'चिमणीबाई, थँक यू !' नितिन मनात म्हणाला.

८

# नंदू आणि चांदणी

रात्र झाली होती. अंधार पडला होता. सगळीकडचे दिवे लागले होते. नंदूच्याही घरातले दिवे लागले होते. आकाशात सोनेरी फुलांसारख्या चांदण्या चम चम करीत होत्या आणि हापूसच्या आंब्याच्या फोडीसारखा दिसणारा चांदोबाही उगवला होता.

छोटचा नंदूचं जेवण झालं होतं आणि तो पडला होता गादीवर. आई आणि बाबा जेवायला बसले होते. नंदूच्या डोक्याखाली मऊ मऊ उशी देऊन, फुलाफुलांची दुलई घालून आणि एक पाप्पा घेऊन आई गेली होती जेवायला. जाताना म्हणाली होती 'आता झोपा हं नंदूराजे !'

पण नंदूला काही झोप येईना. त्यानं अंगावरचं पांघरूण टाकून दिलं ; उशीत तोंड खुपसलं आणि जोरात धाप धाप पाय आपटले तरी आईला काही ऐकू गेलं नाही. मग मात्र नंदूनं तोंड वर

काढलं, डोळे वारीक केले, ओठ वेडे वाकडे केले, आणि हा एवढा गळा काढणार तेवढ्यात–

नंदूचं लक्ष गेलं खिडकीतनं दिसणाऱ्या एका चांदणीकडे. त्याच्याकडे बघूनच ती हसत होती. नंदू रडायचं विसरूनच गेला. नंदूनं आपला छोटासा हात वर केला आणि चांदणीला केलं 'ये ये ये ये!'

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय श
बाल वाङ्मय विभाग
क्र. 9802 दिनांक



आणि काय गंमत झाली? चांदणी आपली खरंच की नंदूच्या खोलीत आली! गोरी गोरी, हसरी! तिचे डोळे कसे लुकलुक करीत होते! तिनं रेशमाचा पिवळा फ्रॉक घातला होता आणि

केसांना पण पिवळीच रिबीन लावली होती. तिच्या अंगाला जाईचा सुंदर वास येत होता.

'काय नंदोबा, झोप नाही का येत?' तिनं नंदूला हसत हसत विचारलं. 'छे ग, बरं झालं तू आलीस ते. आता आपण दोघं मिळून खेळू तरी. नाहीतर मी आपला रडायलाच लागणार होतो!' नंदू म्हणाला.

'छे छे! आता रडायचं नाही. अन् खेळायचं पण नाही. आता अशा भलत्या वेळी खेळायला लागलो म्हणजे आई रागावेल ना तुझी!' चांदणीनं सांगितलं.

'हत् तुमची! खेळायचं नाही तर मग तू आलीसच कशाला आमच्याजवळ? आम्ही आपले डोक्यावरनं पांघरूण घेऊन झोपूनच जातो!' नंदू रुसला आणि खरोखरीच डोक्यावरनं पांघरूण घेऊन झोपला.

तशी चांदणीनं केल्या पाठीला गुदगुल्या आणि म्हणाली, 'रुसुबाई! काढते पांघरूण. मी काय गंमत करते ते तर बघ!'

नंदूनं हळूच पांघरूण काढलं आणि तो चांदणीकडे पाहू लागला. चांदणी म्हणाली, 'तुला काय पाहिजे असेल ते मला सांग. मनीमाऊची शेपटी, पोपटभैयाची लाल लाल चोच, कोंबडेदादाचा छानदार तुरा! काय हवं ते मला सांग. ते लगेच तुला मी देईन.'

'काय फसवतेस होय ग मला!' नंदूनं रागावून विचारलं.

'अरे फसवीन कशाला? दोस्त आहेस ना तू माझा? सांग काय हवं ते तुला!'

'काय बरं मागावं?' नंदू विचार करायला लागला.

त्यानं इकडं पाह्यलं, तिकडं पाह्यलं, खाली पाह्यलं, वर पाह्यलं वर दिसलं त्याला चिऊताईचं घरटं.

'हां हां ! बरी आठवण झाली. देतेच आहेस तर चिऊताईचे पंख दे वघू मला' नंदूनं सांगितलं.

'चिऊताईचे पंख ना ! देते की. हं ! मीट डोळे घट्ट. एक दोन तीन. उघड आता. . . वघ आले की नाही चिऊताईचे पंख तुला ?' चांदणीनं हसत हसत विचारलं.

नंदूनं पाह्यलं. खरंच की ! चिऊताईसारखे पंख आले होते त्याच्या दंडाजवळ. त्यानं एकदा या पंखाकडे पाह्यलं, एकदा त्या पंखाकडे पाह्यलं. पंख थोडे हलवले. आवाज केला फड्फड् ! छान आवाज येत होता.

'आवडले ना !' चांदणीने विचारलं.

'छान आहेत की ! पण उडता येईल का ग यांनी मला ?' नंदूनं विचारलं.

'हो हो, वघ तर !' चांदणी म्हणाली.

खरंच की ! नंदूला उडता येत होतं. त्यानं खोलीतल्या खोलीत उडून पाह्यलं. मग हळूच चिऊताईच्या घरट्यापर्यंतदेखील तो उडाला. घरट्यात डोकावून पाहून आला. चिऊताई नि चिऊ-ताईची बाळं छान झोपली होती.

नंदू पुन्हा गादीवर आला. बसला.

'पण असले काळपट पंख असण्यापेक्षा फुलपाखराच्या पंखां-सारखे सुंदर पंख असते तर किती छान झालं असतं नाही ?' तो चांदणीला म्हणाला.

'एवढंच ना ? मीट तर डोळे. एक, दोन, तीन. हं, उघड आता नि बघ.'

नदून पाह्यलं तर काय ? आईच्या नायलॉनच्या साडीसारखे रंगीबेरंगी झाले होते पंख. त्याच्यावर होते ठिपके – पिवळे धम्मक. काळेभोर. अन् होत्या रेघा – निळ्या – हिरव्या – लाल, कितीतरी.

नंदूला फारच आवडले ते पंख. तो त्यांच्याकडे पाहतच राहिला. पंख वरखाली हलवत राहिला.

' खूष झाली का स्वारी ? चिऊताईसारखे पंख झाले, फुल-पाखरासारखे रंग झाले, आता काय पाहिजे ? '

' आता मला बोलता आले पाहिजे. मिठूमियासारखे, विठ्ठू विठ्ठू ! शीळसुद्धा घालता आली पाहिजे ! '

' हो, येईल की. सगळं होईल. मीट डोळे, एक, दोन, तीन ! हं, उघड वघू आता. बोल मिठूमियाँ, बोल विठ्ठू विठ्ठू ! '

' विठ्ठू विठ्ठू, विठ्ठू विठ्ठू ! ' नंदू बोलला. फारच गंमत वाटली त्याला. चांगली शीळसुद्धा घालून पाहिली त्यानं.

चिऊताईचे पंख, फुलपांखराचे रंग, पोपटाचा आवाज ! नंदू झाला खूष. आपले रंगीबेरंगी पंख फडफडवीत, विठ्ठू विठ्ठू करीत नाचायलाच लागला !

' काय, नंदोबा, लागली का झोप ? ' आईनं स्वयंपाकघरातूनच विचारलं. ' गडवड दिसत नाही तेव्हा झोपच लागलेली दिसत्येय. '

' नाही ग आई, जागाच आहे मी अजून ! पण मला बघ काय काय मिळलंय— ' असं सांगायचं होतं नंदूला, पण त्याला फक्त बोलता आलं विठ्ठू विठ्ठू विठ्ठू ! फक्त विठ्ठू विठ्ठू ! पोपटासारखं !

'काय मेला शेजारचा पोपट रात्रीचा ओरडतोय!' आई चिडून म्हणाली!

नंदूनं हाक मारली 'आई, आई!' पण त्याला कुठं आई म्हणता येत होतं! त्याच्या तोंडातून आपला पोपटाचाच आवाज येत राह्यला 'विठ्ठू विठ्ठू!' ती हाक काही आईला समजेना. आईला वाटले की नंदू गेला झोपून अन् पोपट बसलाय् ओरडत! ती काही नंदू जवळ येईना.

मग मात्र नंदू लागला रडायला.

'हे रे काय? रडतोस का आता सगळं मनासारखं झाल्यावर?' चांदणीनं विचारलं.

पण नंदूला बोलता कुठं येत होतं? तो सारखे पंख ओढायला लागला, थयथयाट करायला लागला, मानेनं नक्को नक्को करायला लागला.

'मला नाहीये कळत तुला काय हवंय, अन् काय नकोय ते! आधी ते विठ्ठू विठ्ठू थांबव पाहू. हं मीट डोळे एक, दोन, तीन हं, उघड आता अन् नीट सांग तुला काय हवंय ते!'

'मला हे पोपटाचं विठ्ठू विठ्ठू नको, चिऊताईचे पंख नकोत, फुलपाखराचे रंग नकोत, मला आपला पहिल्यासारखा कर. आईचा नंदू कर मला!' नंदूनं सांगितलं.

'एवढंच ना! मग त्याला इतकं रडायला कशाला पाहिजे? मीट डोळे. दोनदा एक, दोन, तीन म्हणेपर्यंत मीट म्हणजे चिऊताईचे पंखही जातील, अन् फुलपाखराचे रंगही जातील. हं, मीट डोळे, एक, दोन, तीन. उघड आता?'

नंदूनं डोळे उघडले, पाह्यलं पंख गेले होते. रंगही गेले होते. वरं वाटलं त्याला. त्यानं डोळे पुसले अन् तो हसायला लागला.

'झालं ना मनासारखं ? आता झोप. मीही जाते परत!' चांदणी म्हणाली.

'उद्या येशील ?' नंदूनं विचारलं.

'येईन, पण असलं भलतं सलतं मागायचं नाही काही !'

मग चांदणीनं नंदूचं डोकं नीट उशीवर ठेवलं, त्याच्या अंगावर नीट पांघरूण घातलं, त्याचा एक पाप्पा घेतला नि गेली वर आभाळात. वर जाऊन हसत बसली.

नंदूला पण छान झोप लागून गेली !

१

# मिंकू आणि उंदीर

मिंकूश्रींना घरी आणल्याच्या दुसऱ्या दिवशी सकाळची गोष्ट. कधी नव्हे तो मी लौकर उठलो. (असं आईच म्हणाली तेव्हा ते खरं असणारच ! ) आधी जाऊन खोक्यातल्या अंथरुणात झोपलेल्या मिकूकडे पाहून घेतलं. (अंथरुणात खाली गवत, वर जुने फाटके कपडे, आणि हो, सांगू नका, आईची घरी नेसायची मऊमऊ साडी घातली होती. ) मिंकूशेट झोप संपवून खोक्यातून बाहेर पडायच्या उद्योगाला लागले होते. त्यांना बाहेर काढून तिथंच ठेवून मी आईसमोर उभा राहिलो आणि म्हणालो,

'आई, दूध ! '

यात एवढं दचकण्यासारखं काय होतं ? पण मी आपण होऊ

दूध मागतोय म्हटल्याबरोबर आईच्या हातातनं चहाचं पातेलं निसटून खाली पडायची वेळ आली.

‘का रे, रोज दुधाचं नाव काढताच मळमळतं म्हणणारा तू, आज आपण होऊन दूध मागतोयस? दूध? तब्येत बरी आहे ना रे?’ असं म्हणत आईनं माझ्या कपाळाला हातदेखील लावून पाहिला.

‘काही झालेलं नाही मला. पण दूध मात्र दे. अगदी लौकर. खूप भूक लागलीय!’ मला तरी आयत्या वेळी खोटं बोलायचं कसं सुचलं कोण जाणे!

मी हातात ग्लास घेऊन उभा राहिलो तरी आईचं आपलं चहा गाळणं चालू मग मी ओरडलो,

‘अग, आधी दूध घाल मला अन् मग गाळ की तुझा तो चहा!’


‘खरंच बाई मला कळतच नाहीये हे पोरगं आज दूध कसं मागतंय ते!’ आईचं आपलं चालूच!

एवढ्यात ताईवाई हजर झाल्याच. अन् म्हणाल्याच, ‘अग, काल पिल्लू आणलंय ना मांजराचं? त्याच्यासाठी हवं असेल त्याला दूध!’ आता हिला चमचा ढवळायची काय जरूरी होती. पण मग त्या ताईवाई कसल्या!

‘असं होय मेल्या! तुझ्या मांजराला दूध घालू म्हणतोयस होय? अरे इथं माणसांना दूध मिळेना अन् तुझ्या त्या लाडको-वाला कुठून आणू रे दूध’ मातोश्री कडाडल्या. आणि म्हणाल्या, ‘हे बघ, मांजर आणलंयस ते आणलंयस. त्याला दूधबीध काही मिळणार नाही!’

‘ मग काय उपाशी का राह्यचंय त्यानं ? ’ मी विचारलं खरं, पण माझा घसा अगदी दाटून आला होता.

‘ हे बघ घरात उंदीर झालेत खूप. ते खा अन् चांगला लठ्ठ हो म्हणावं तुझ्या मांजराला ! ’ आईबाई म्हणाल्या.



‘ अरे अरे, तो बघ, तो बघ उंदीर, तो बघ कपाटाखाली गेला. छोटास्साच आहे. येईल तुझ्या मांजराला खायला. जा जा, घेऊन ये त्याला लौकर ! ’ ताई ओरडली.

मी खरंच धावत धावत गेलो अन् मिकूला हातात घेऊन आलो. त्याच्या पाठीवर हात फिरवून त्याला ‘ बेस्टलक. ’ सुद्धा म्हणालो. पठ्ठयानं खरंच उंदीर मारला असता तर केवढं मोठं काम झालं असतं ! मग आईला रागवायला काही कारण उरलं नसतं.

ज्या कपाटाखाली उंदीर गेला होता, त्या कपाटापाशी मी मिकूला हळूच सोडला. आणि म्हटलं, ‘ जा रे उंदीर मार आईचा ! ’ आम्ही सगळेच तो आता काय करतो ते बघायला लागलो. माझ्या तर छातीत धडधडायला लागलं होतं.

पण मिकू कसलं ? ते आधी उभं राहताराहताच धडपडलं. मग

उगीच इकडेतिकडे बघून जिभल्या चाटत 'म्याँव, म्याँव' ओरडलं. कपाटातून उंदराची खुडखुड ऐकायला येत नव्हती, की उंदराचा वासही येत नव्हता! तो काही खाली जाऊन उंदराला मारील असं दिसेना. मग मीच एक काठी घेतली अन् ढुसकून ढुसकून उंदराला बाहेर काढलं.

अन् काय आश्चर्य! तो उंदीर आल्याबरोबर मिकूनं टुण्कन उडी मारली अन् तो घाबरून कपाटाखाली लपला! आई अन् ताईटली अशा हसल्या नुसत्या! नाही पकडला एखाद्यानं उंदीर म्हणून काय त्याची एवढी चेष्टा करायची! मी आपला त्याला घेऊन खाली मान घालून तिथून निघून गेलो. काय करणार?

अर्थात्, मी काही मिकूला उपाशी नाही हं ठेवलं. त्याला दूध, दही–भात, बिस्किटं अशी रसद चोरून पोचवली त्यानं ती सगळी फस्त केली. गाभुळलेली चिंच आणि मीठ लावलेली. कैरी मात्र बेटयाला आवडली नाही!

*

१०


# आई, मी तुझ्याकडेच राहातो !

दुपारची जेवणं झाली. बाबा ऑफिसला गेले. ताई कॉलेजात गेली. दादा शाळेत गेला. छोटा मिनू आणि आई त्याची अशी दोघंच राहिली घरात.

आईनं झाकपाक केली आणि मिनूला जवळ घेऊन ती पलंगावर पडली. मिनूला तिनं एक गोष्ट सांगितली. त्याला हळूहळू थोपटत गाणं म्हटलं नि त्याचा एक पापा घेऊन म्हणाली, ' झोप हं आता राजा ! ' आणि ती स्वतःच झोपून गेली ! तिचे डोळे घट्ट मिटून गेले.

आई झोपली खरी, पण मिनूला काही झोप लागेना. त्यानं हळूच आईला हाक मारली, ' आई ए आई ! ' पण आईला कुठली ती ऐकू जायला ?

मग त्यानं शेजारच्या बाळासारखे हातपाय हवेत हलवले. आपलेच केस थोडेसे उपटले, भिंतीवरची चित्रं पाहिली, खुंटीवरचे कपडे मोजले, खिडकीतून बाहेरचं आकाश पाहिलं, एक पेरूची फांदी हालत होती ती त्याला दिसली. मान वळवून ती ओरडली, ' चिव चिव ! ' मग तिचं लक्ष मिनूकडे गेलं. ती मिनूला म्हणाली, ' चिव, चिव ! '



मिनू म्हणाला, ' चिऊताई, चिव चिव ! काय करतेस ? ' चिऊताई म्हणाली, ' काही नाही. फिरतेच आपली नुसती ! ' मिनू म्हणाला, ' चिऊताई, चिऊताई मला आलाय कंटाळा. घरात एकटी आई नि मी. आई गेली झोपून. मला काही झोप येत नाही. मी येऊ का तुझ्याकडे ? '

चिऊताई म्हणाली, ' वा वा, ये की. माझं घर कस मऊमऊ

आहे. कालच रुईचा कापूस मिळाला मला. अन् तुझ्याशी खेळायला बाळं पण आहेत माझ्याकडे! चल ना. राह्यलाच ये चार दिवस.'

मिनू म्हणाला, 'अग पण आहे कुठं तुझं घर?'

चिऊताई म्हणाली, 'अरे विनूच्या घरात, तुळईखाली!'

'इतक्या उंच? अन् तिथं चढायचं कसं पण?' मिनूनं विचारलं.

'त्यात काय एवढं अवघड? मी जाईन उडून. तू ये कपाटावर चढून!' चिऊताईनं सांगितलं.

'अन् खायला काय देशील मला?'

'देईन की जोंधळ्याचे दाणे, तांदळाचे भातकण–' बोलता बोलता चिमणी एकदम फांदीवर वाकली, टुच्दिशी तिनं काही-तरी उचललं, चोंच वर केली नि गिळून टाकलं!

'काय ग खाल्लंस ते?' मिनूनं विचारलं.

'काय म्हणजे? आळी! – काय मस्त लागली!'

'काय म्हणालीस?'

'आळी रे आळी!' चिऊताईनं उत्तर दिलं.

'आळी, तू खाल्लीस! शीः!'

मिनूनं एकदम डोळे मिटून घेतले नि उशीत तोंड खुपसलं. चिऊताई गेली उडून.

'आहो मिनूमियाँ!' मिनूला कुणीतरी हाक मारली. मिनूनं वळून पाहिलं. पेरूच्या फांदीवरून एक पोपट त्याला हाक मारीत होता. हिरव्या रंगाचा, लाल चोचीचा.

'काय मिठूमियाँ?' मिनूनं विचारलं.

‘ कंटाळलेला दिसतोस. येतोस का माझ्याकडे राहायला चार दिवस ? ’

‘ येईन, पण खायला काय देशील तू मला ? ’ मिनूनं आपलं आधीच विचारून घेतलं.

‘ खायला ना, देईन लाल लाल पेरू, पिकलेलं डाळिंब, भिजलेली डाळ ! ’

‘ हं, मग हरकत नाही. चल येतो थोडा वेळ तुझ्याकडे मी. कुठं आहे तुझं घर ? ’

‘ इथून नाही दिसणार. अंगणात चल. ’

मिनू अंगणात गेला. घराच्या छपराला लागून बारके बारके कोनाडे होते. त्यातल्या एकातून डोकावून मिठूमियॉनं हाक मारली.

‘ ये मिनू, ये माझ्या घरी ! ’

‘ अरे पण किती उंच तुझं घर, अन् केवढं छोटं ! मी कसा मावणार त्याच्यात ? ’

‘ मिनू, त्याच्यापेक्षा तू आमच्याकडे का नाही येत राहायला ? ’ देवा गडचाचा कोंबडा जास्वंदीच्या फुलासारखा लाल लाल तुरा हालवीत म्हणाला, ‘ माझ्या इटुकल्यापिटुकल्या पिल्लांशी खेळताना किती मज्जा वाटेल तुला ! ’

‘ राहातोस कुठं पण तू ? ’

‘ देवाजीच्या खुराडचात. मी, कोंबडचा, माझी पिल्लं ! सारी आम्ही खुराडचात राहातो. अन् दिवसभर मजेत हिंडतो खात खात ! ’ कोंबडचानं सांगितलं.

‘ काय खातोस तू ? ’

‘ हेच आपलं, जोंधळे, .तांदूळ मधनंमधनं थोडेसे खडे ! ’

‘ खडे, म्हणजे दगड ? ’

‘ हो, आपले छोटे छोटे ! ’

‘ ते रे कशाला ? आमच्या बाबांच्या भातात एखादा खडा आला तरी त्यांना किती राग येतो. अन् तू आपला मुद्दाम खडे खातोस ? ’

‘ हो ना, नाहीतर आम्ही खाल्लेलं पचत नाही ना आम्हाला ! ’

‘ बरं, मी नाही खडे खाणार म्हणजे झालं ! दाखव बघू तुझा खुराडा ! ’ मिनूनं सांगितलं. कोंबडा त्याला घेऊन देवाजीच्या अंगणात गेला.

‘ तो बघ माझा खुराडा ! बघ कसा छान आहे ! ’ कोंबड्यानं दाखवलं.

‘ वा रे वा, याच्यात माझं डोकं तरी नीट जाईल का ! ’ मिनू म्हणाली.

झाडावरनं सरसर खाली उतरून खारूताई मिनूजवळ आली न् म्हणाली,

‘ मिनूदादा, माझ्याकडे ये ना आपला चार दिवस ! ’

‘ अग पण राहतेस कुठं तू खारूताई ? ’ मिनूनं विचारलं.

‘ मी ना, राहते त्या पलीकडल्या झाडाच्या ढोलीत ! ’ खारूताईनं सांगितलं.

‘ ढोली म्हणजे ग काय ? ’

‘ झाडात असं खड्ड्यासारखं असतं ना ते. चल माझ्याबरोबर, दाखवते तुला. ’

मिनू निघाला खारूताईबरोबर. खारूताईला झाला फार आनंद. ती आपली बोलतच सुटली.

‘ माझ्याकडे की नाही खूपखूप फळं आहेत साठवलेली. वडाची, उंबराची. दिवसभर आपलं झाडावर खेळावं, फळं खावी, झोप आली की झोपावं. तू आलास म्हणजे खूप गंमत येईल बघ खेळायला ! ’

बोलता बोलता मिनू खारूताईच्या घराच्या झाडाजवळ येऊन पोचला. सर्रकन् वर चढून खारूताईनं त्याला ढोली दाखवली.

‘ हा, तिच्याएवढंच का तुझं घर ? मी कसा ग मावणार तुझ्या घरात ? ’

‘ हऽम्माऽ ! मिनूचा आवाज ऐकून गोठ्यातल्या गाईनं हाक मारली.

‘ मिनू, अरे माझं घर बघ किती मोठं आहे ! तू आपला माझ्याकडेच ये राहायला ! ’ गाईनं मिनूला बोलावलं. मिनू गोठ्यात गेला. खरंच गाईचं घर चांगलं मोठं होतं. शिवाय गाईचं एक छानसं वासरू पण होतं तिथं. मिनूला पाहताच ते उड्या मारू लागलं.

‘ काय ग पण गाईबाई, तुझ्या गळ्यात हा दोर कशाला ? ’ मिनूनं विचारलं.

‘ हे ना, हे दावं, खांबाला बांधलंय ते ! ’

‘ का ग, पळून जातेस वाटतं कधी कधी तू ? ’

‘ छे रे, मी नाही पळून जात. पण कुणी मला पळवून नेलं तर ! तसं व्हायला नको म्हणून हे दावं. तुझ्या नाही गळ्यात बांधणार, मग तर झालं ? ’

‘ आणि अंथरुण-पांघरुण काय तुझ्याकडे ? ’

‘ अंथरुण-पांघरुण रे कशाला ? ’

‘ थंडी वाजली तर ? ’

‘ मला नाही थंडी वाजत ! ’

‘ आणि खायचं काय ? ’

‘ गवत ! हे एवढं गवत पडलंय की इथं. शिवाय पाऊस पडला की रानात जायचं चरायला ! ’

‘ म्हणजे गवत खायलाच ना ! ’

मिनूच्या आईनं झोपेतच हात हालवला. पण हाताला मिनू कुठं लागला नाही. दचकून तिनं डोळे उघडले. पाहाते तर मिनू कुठं आहे ? ‘मिनू, मिनूऽऽ’ अशा हाका मारीत ती घरभर फिरली.... दारात येऊन हाका मारू लागली, ‘ मिनू, अरे राजा ! ’

तशी मिनू धावत धावत तिच्याकडे आला. आईनं त्याला उचलून घेतला, चार पापे घेतले. ‘ कुठं गेला होतास रे ? ’ असे म्हणत ती त्याला घरात घेऊन गेली.

मिनू घरभर हिंडला, स्वयंपाकघर, माजघर, ओटी....सगळीकडे फिरून आला. आईला म्हणाला, ‘ आई, मला खायला काय ? ’

आई म्हणाली, ‘ काय देऊ ? खारीक, जर्दाळू, मुसुंबं, केळं, पेढा, पोळी, काय हवं तुला ? ’

‘ आता काही नको. एक पेढा दे आपली. पण मी तुझ्याकडेच राहायचं ठरवलंय. तुझं घर किती छान, तुझा खाऊ किती छान ! मला आपलं तुझंच घर आवडले ! मी तुझ्याकडेच राहाणार ! ’

‘ हो ना, छाऽना आहे ग माझा राजा ’ करीत आईनं मिनूचे आणखी चार पापे घेतले व त्याला दोन पेढे दिले.

मिनूला पेढे आवडले, आई आवडली अन् घर आवडलं !

*

११

# राजूची जम्मत

राजूची जम्मत म्हणजे राजूच्या पोटाची जम्मत बरं का. आणि राजूच्या पोटाची म्हणजे त्याचं पोट दुखलं त्याची—म्हणजेच पोट दुखलं नाही त्याची—गंमत काय भानगड आहे ही ऐका. राजूच्या पोटदुखीची आणि तिच्यावरच्या औषधाचीही.

तर आमच्या राजोबांना घरी पाहुणे आलेले फार आवडतात. कारण पाहुणे राजूचे लाड करतात. त्याला चेंडू, पुस्तकं, कॅडबरी असं काही ना काही आणतात. अन् शिवाय पाहुणे आले म्हणजे आई छान छान खायला करते. पोहे, भजी, कधी कधी बटाटेवडे सुद्धा ! आणि पाहुणे जेवायला आले म्हणजे तर थाटमाट काही विचारूच नका. पाहुण्यांची चंगळ होतेच पण राजोबांची त्याहून जास्त. मस्त खायला मिळतं अन् शिवाय कसंही वागलं तरी आईचं

लक्ष थोडंच जाणार असतं ? ती आपली असते पाहुण्यांच्यातच दंग ! एकूण पाहुणे आले की राजोबा खूष असतात.

त्या दिवशी असंच झालं. राजूची आत्या आली होती जेवायला. आईनं असा मन लावून बेत केला होता म्हणता ! मटाराची उसळ, पापड-कुरड्या, ओल्या नारळाच्या करंज्या. बापरे! राजूच्या तोंडातून पाण्याचे धबधबेच वहायला लागले.

आत्याबरोबर तिचा लाडका भाचाही जेवायला बसला. आत्याला आग्रह करीत होते बाबा आणि आई, तर आत्या राजूला आग्रह करून वाढायला लावत होती.



राजूनं किती पापड, किती करंज्या, किती मटाराची उसळ खाल्ली कोण जाणे. पण जेवण संपलं तशी राजूला आपण कासव

झालो आहोत आणि कोणीतरी किल्ली दिल्याखेरीज आपण चालूच शकणार नाही, असं वाटायला लागलं. कशीबशी स्वारी उठली आणि गुंग होऊन काहीतरी चित्राचं पुस्तक पाहात पडून राहिली. आत्यानं चांगली पाच पुस्तकं आणली होती चित्रांची. राजूला आवडतात ना, म्हणून.

झालं, चार वाजले तशी आत्या निघाली घरी जायला. राजूच्या दोन्ही गालांचे गालगुच्चे घेऊन आणि कपाळाचा पापा घेऊन ती गेली निघून.

अन् इकडे राजूला कसंतरीच वाटायला लागलं. त्याचं तोंड वेडंवाकडं झालं. डोळ्यांत पाणी उभं राहिलं.

आत्याला रिक्षात बसवून आई घरात येतेय तोवर राजोबाचं रडं चांगलंच वाढलं होतं. डोळ्यातनं पाण्याच्या धारा लागल्या होत्या आणि तोंडातनं रडका सूरही निघत होता.

‘ काय रे, काय झालं रडायला ? ’ आईनं चकित होऊन विचारलं.

राजूला थोडंच सांगता येणार की आत्या निघून गेली. एवढे माझे लाड करणारी आत्या गेली म्हणून मला वाईट वाटतंय, म्हणून मला रडायला येतंय ! तो आपला रडतच राहिला.

‘ पोट का दुखतंय तुझं ? सकाळी जेवलास बैलासारखा. तेव्हाच वाटत होतं मला की याच्या पोटाचं काय होणार कोण जाणे ! ’ आई रागावून म्हणाली. राजूनं काहीतरी मान हलवली. आईला वाटलं, खरंच याचं पोट दुखतंय. ती काहीतरी औषध आणायला आत गेली.

एवढ्यात सायकलची घंटा वाजली. राजूनं ओळखलं की ताई आली कॉलेजातनं! पण त्याचं रडू काही त्याला आवरता आवरेना.

सायकल ठेवून ताई घरात यायला अन् कपात काहीतरी. औषध घेऊन आई बाहेर यायला एकच गाठ पडली.

'काय ग आई ते ?' ताईनं विचारलं.

'अग औषध. राजूचं पोट दुखतंय ना. बघ कसा रडतोय!' आईनं सांगितलं.

'अगं मग ते नाही काही औषध द्यायचं – गुळांबा द्यायचा. होय की नाही राजू ?' चल माझ्याबरोबर. तुला देते गुळांबा, मी खाते करंज्या' ताई म्हणाली. राजू खरंच रडायचा थांबला!

राजूचे हात धरून ताई त्याला आत घेऊन गेली. तिनं चांगला दोन डाव गुळांबा दिला. राजूनं तो चटकमटक करीत संपविला!

तेव्हापासून राजूकडच्या गुळांब्याला नाव काय पडलं माहीत आहे ?

राजूच्या पोटदुखीचं औषध!

आहे की नाही जम्मत ?

*

१२

# शुभाची अंगाई

शुभाचे बाबा जेवून ऑफिसला गेले. दादा पण गेला जेवून शाळेत. शुभा होती फार लहान. ती काही अजून शाळेत जायला लागली नव्हती. दादा आणि बाबा बाहेर गेले तशी शुभाची आई बसली जेवायला.

शुभा तिथेच पाय पसरून बसली होती आईजवळ. तिनं इकडं पाहिलं, तिकडं पाहिलं आणि दिली मोठी जांभई !

आई म्हणाली, ' जा शुभाबाई, झोप आलेली दिसतेय तुम्हाला. झोपा जा जाऊन गादीवर. '

पण शुभा म्हणाली, ' ऊंऽ ! तू अंगाई म्हणून झोपव ! '

' अग पण जेवायला बसलेय ना मी ? माझं जेवण व्हायचंय. इथलं सगळं आवरून व्हायचंय्. तोवर का तू ताटकळत बसणार ?

जा अं, जाऊन झोप. माझं आवरले की मी येतेच. जा अं बाई !'

तशी शुभा गादीवर जाऊन पडली. उताणी पडून हातपाय हलवून झाले. बोटं नाचवून झाली. पण झोप काही येईना !

छताच्या एका कोपऱ्यात चिऊताई घरटं बांधत होती. तिचं लक्ष गादीवर पडलेल्या शुभाकडे गेलं.



'काय शुभाताई, काय चाललंय ?'

'काही नाही ग चिऊताई ! मला आलीय झोप, पण आई बसलीय जेवायला. आईने गाणं म्हटल्याशिवाय काही मला झोप येत नाही ! पडलेय झालं आईची वाट पहात !'

'हात्तिच्या, मी म्हणू का गाणं ? माझ्या बाळांना म्हणते तशी ?' चिऊताईनं विचारलं.

'वा, वा ! म्हण ना !' शुभानं डोळे मिटले. ऐकू लागली. चिऊताईनं गाणं सुरू केलं – चिव् चिव् चिव् चिव् ! एकसुरी आपलं चिव् चिव्.

'इश् ! असलं काय ग म्हणतेस ? छान म्हण ना, आई म्हणते तसं ! ' शुभानं डोळे उघडून चिऊताईला सांगितलं.

'वा ग वा, हे गाणं वाईट वाटतं ? माझीं बाळं झोपतात हेच ऐकून. तुला नसलं झोपायचं तर राहा जागी. मला आहेत शंभर कामं ! आहे कुठे वेळ मला तुझ्याशी खेळत बसायला ? ' चिऊताई चिडली नि भुर्रर्र उडून गेली.

खिडकीतनं दिसत होती फांदी. तिच्यावर होता कावळा. तो म्हणाला, 'का ग शुभा, का ग गेली ती चिऊताई चिडून ? '

'ती म्हणत होती अंगाई मला. पण कसली अंगाई ? चिव् चिव्, चिव् चिव् ! ' शुभानं हसत सांगितलं. कावळ्यालाही हसायला आलं.

'चिव् चिव् अशी का कुठं अंगाई असते ? थांब, मी म्हणतो तुला अंगाई ! ' कावळा म्हणाला.

'बरं ! ' शुभा म्हणाली, नि डोळे मिटून ऐकू लागली. कावळ्यानं घसा साफ केला नि सुरू केलं.

'काऽव् काऽव्, काऽव् काव् ! '

'इश्, असली कसली रे तुझी अंगाई ? ' शुभा रागावून म्हणाली. 'बास का ? ही पण नाही का आवडली तुला ? मग बैस जागत आई येईपर्यंत ! ' कावळाही चिडला नि फड फड फड पंख उडवीत निघून गेला.

गादीजवळनं जात होतं एक झुरळ. ते म्हणाले, ' काही घाबरू नकोस शुभा. मी म्हणतो अंगाई तुला ! '

‘ म्हण म्हण ! ’ शुभा म्हणाली नि ऐकू लागली. झुरळानं मिश्या एकमेकांवर घासून साफ केल्या नि गायला तोंड उघडलं. तोंडं वेडीवाकडी करीत ते तिथं उभं राहिलं.

‘ हे काय रे झुरळा ? नुसताच काय तोंडं वेडीवाकडी करतोस ? अंगाई म्हण ना ! ’ शुभा म्हणाली.

‘ म्हणजे ? तुला ऐकू नाही का आलं माझं गाणं ? ’ झुरळानं आश्चर्यानं विचारलं.

‘ छे छे ! मला नाही तुझं गाणंबिणं ऐकायला आलं. फक्त वेडीवाकडी तोंडं तेवढी दिसली ! ’

‘ बरं, आता खूप जोरात म्हणतो हं, ऐक नीट ! ’ झुरळानं सांगितलं. शुभा ऐकायला लागली. पण तिला काही ऐकायला येईना. झुरळाचा आवाज तो ! तिला कसा ऐकू जाणार ?

‘ काही ऐकायला येत नाही मला तुझं गाणं ! ’

‘ आता ओरडू तरी किती ? तुला मुळी झोपायचं नाही आहे. मला आहेत छप्पन कामे. पुस्तकं खायचीत. कपडे खायचेत. मला आहे कुठे वेळ ? ’ झुरळ तणतणत निघून गेलं.

शुभाला कंटाळा आला. ती दारात येऊन बसली. रस्त्यातनं जात होतं एक गाढव. गाढव म्हणालं,

‘ का ग शुभा, अशी का दारात येऊन बसलीस ? ’

‘ अरे मग काय करू गाढवदादा ? मला आलीय झोप. पण आई तर बसलीय जेवायला. मग कोण मला अंगाई म्हणणार ? बसलेय झालं वाट पहात ! ’ शुभानं सांगितलं.

‘ एवढंच ना ! मला वाटले की झालं तरी काय हिला ! मी म्हणतो अंगाई तुला. मीट डोळे ! ’

' म्हण, पण चिव् चिव् नाहीतर काव् काव् नको म्हणू. नि त्या झुरळासारखी अगदी हळू पण नको म्हणूस ! ' शुभानं बजावलं.

' छे छे ! अग मी कशाला चिव् चिव् नाहीतर काव् काव् म्हणीन ? आणि हळू तर मुळीचच म्हणणार नाही. ऐक हं ! '

गाढवानं गाणं म्हणायला सुरुवात केली. चांगला मोठा आवाज काढून. ' हाँ आँ, हाँ आँ, हाँ आँ ऽ ऽ ऽ ! '

शुभानं दोन्ही कानांत दोन बोटं घातली नि ती पळत पळत आतल्या खोलीत येऊन उभी राहिली. गाढव गेलं बिचारं निघून.

आतल्या खोलीत होता रेडिओ. तो म्हणाला, ' शुभा, अग गाणंच हवं तर माझं बटण फिरव ना! तुला हवं तितका वेळ गाणं ऐकायला मिळेल ! '

खरंच की, शुभानं रेडिओचं बटण फिरवलं नि ती ऐकत उभी राहिली. गाणं सुरू झालं.

' आ आ आ, आ आ आ आ .... सारे मप धनीसा... आऽ ऽ ऽ ऽ ऽ ! ' नुसतं आपलं आ आ आ आ आणि काहीतरी शब्द !

' इश्श ! हे कसलं गाणं ? धा ऽ ऽ ऽ ला ऽ ऽ ऽ ध ऽ प ऽ काऽ ऽ याला काय गाणं म्हणतात ? '

शुभानं चटकन् रेडिओ बंद केला, तेवढ्यात आईचं जेवण झालं. ती हात पुसतपुसत शुभाजवळ आली नि म्हणाली,

' काय शुभाताई ? झोप नाही लागली अजून ? '

अं अं अं ! तू का नाही गाणं म्हणत ? मग कशी आम्हाला येणार झोप ? ' शुभानं आईला बिलगून म्हटलं.

‘ हं, चला गादीवर , चला गाणं म्हणते ! ’

आईनं मग शुभाला गादीवर झोपवलं. छान छान फुलाफुलांची उशी दिली. मऊ मऊ रेशमी दुलई अंगावर घातली, नि तिच्या इवल्याशा कपाळावर हलके हलके थोपटत म्हणायला सुरुवात केली,

‘ शुभाबाळ निजे ! अंथरुण वाजे ! पांघरूण साजे ! शेलि-याचे जो जो अंगाई ! ’

शुभानं हळूच डोळे मिटले नि ती झोपूनही गेली. एका ओवीतच झोपेतच हसायलाही यायला लागलं तिला ! तुमच्यासारखं गोड गोड !

*

१३

## टिल्ल्या उंदीर चंद्रावर !

टिल्ल्या उंदीर होता भारी गडबड्या, भारी चपळ. दिवसभर त्याची धावपळ चालू असायची. स्वयंपाक घरातून झोप-घरात, झोपघरातून दिवाणखाण्यात तुरतुर चालू असायची त्याची. आईचं थालीपीठ, दादाचं पुस्तक, ताईची रिबन नेहमी कुरतडलेली असायची. पण पकडायला गेलं तर हाती लागेल ? नाव नको !

एके दिवशी तर मोठी मजाच झाली. टिल्ल्या उंदीर तर सरळ चंद्रावरच जाऊन पोचला. कसा ते सांगते हं.

संध्याकाळची वेळ होती. जिकडे तिकडे दिवे लागत होते. शिवाशिवी, लपंडाव, फूटबॉल, अबादबी असे सगळे खेळ खेळून संपले होते. पण चंदू, नंदू, गोपी, अमोल कुणालाच घरी जावंसं

वाटत नव्हतं. सगळ्यांच्या आयांची आत्ताशी एकेकच हाक मारून झाली होती. अशा चारपाच हाका ऐकू आल्यावर ओ द्यायची आणि दहाबारा हाका आल्या म्हणजे मग घरी जायचं अशी जणू पद्धत होती साऱ्यांची.


तेव्हा चंदू, नंदू, गोपी, अमोल सारे बसले होते चंदूच्या घराच्या म्हणजे टिल्ल्याच्याही घराच्या – पायऱ्यांवर गप्पा मारीत. आज शाळेत काय झालं, कोणी कोणाशी मारामारी केली, बाईंनी घरचा अभ्यास किती दिलाय अशी बोलणी निघतानिघता विषय आला चंद्राच्या सहलीचा. म्हणजे अपोलो १४ केव्हा उडणार आहे, ते अंतराळवीर चंद्रावर किती दिवस राहणार आहेत, ते चंद्रावर कुठल्या गाडीतून फिरणार आहेत, मुख्य म्हणजे चंद्र पृथ्वीपासून किती लांब आहे. अन् तिथे जातात कसं – या साऱ्यांच्या गप्पा झाल्या. त्यातल्या त्यात अमोल मोठा होता. वर्तमानपत्रांतून, पुस्तकांतून, शाळेतनं त्यानं खूपच माहिती जमवली होती. त्यानं ती जमेल तशी समजावून सांगितली. चंदू, नंदू, गोपी आणि हो छोटचा अकल्पितानंही दोन बोटं तोंडात घालून ती ऐकली.

आणखी कुणी ऐकली ती चंद्रावरच्या सफरीची हकीकत ? माहिती आहे ? आपल्या धावऱ्या, चपळचा टिल्ल्या उंदरानं ! तो तर तिथंच पायरीखाली होता. आपले इवले इवले काळेभोर डोळे मोठमोठे करीत तो सारं ऐकत होता – इकडे तिकडे धावायचं विसरून गेला होता.

शेवटी अंधार पडला. प्रत्येकाच्या आईच्या वीसवीस हाका मारून झाल्या. सगळी बालगोपाळ मंडळी आपापल्या घरी गेली.

अंगणात अंधार पडला. अंगण सुनंसुनं झालं. अंगणात राहिला फक्त टिल्ल्या उंदीर आणि हो – अकलीताच्या हातातला भला-मोठा फुगा. फुगा होता पिवळा धमक आणि त्याच्यावर काढली होती मोठमोठी लाल, निळी, जांभळी फुलं. तो असा एका बाजूला पडला होता. वाऱ्याची झुळूक आली की जागच्या जागीच डुलत होता.

चंद्राच्या सफरीची सगळी हकीकत ऐकून टिल्ल्या उंदीर थक्क झाला होता. त्याला धावपळच काय, साधं शेपटी हलवायचं-सुद्धा सुचेना.



बराच वेळ टिल्ल्या पायरीखाली बसून राहिला अन् मग हळू-

हळू बाहेर पडला. आपल्याच तंद्रीत चालायला लागला.

चालता चालता त्याला दिसला लांबलचक दोरा. सहज चाळा म्हणून त्यानं तो दोरा तोंडात धरला.

इतक्यात मोठा वारा आला. बागेतल्या झाडाची पानं सळसळली, अंगणातल्या सावल्यांनी नाच केला आणि –

आणि काय होतंय ते कळायच्या आतच टिल्ल्या एकदम उचलला गेला. हवेत उडाला. तरंगायला लागला ! कारण त्यानं पकडला होता तो दोरा फुग्याला बांधलेला होता. वाऱ्याबरोबर फुगा उडाला अन् फुग्याबरोबर टिल्ल्याही उडाला – चालला वरवर वरवर !

टिल्ल्याला वाटलं आपण चाललो चंद्रावर. त्याला एकदम आठवलं की चंद्रावर जाणारे प्रवासी पृथ्वीवरच्या लोकांना माहिती सांगतात. आपल्याला कायकाय दिसतं ते सांगतात.

'हॅलो हॅलो, मी टिल्ल्या बोलतोय. मी चंद्रावर चाललोय. हॅलो, मला इथून पांढरी फुलं दिसतायत – केवढी मोठाली आहेत ती आणि वास तरी किती येतोय त्यांचा !'

'हॅलो, चंद्राच्या वाटेवर फारच दाट जंगल आहे. त्या जंगलातल्या झाडांना माझ्या शेपटीएवढे लांब काटे आहेत. त्यांना फार तीक्ष्ण टोकं आहेत.' टिल्ल्या सांगत होता.

'हॅलो, चंद्राच्या वाटेवर फार जोराचा वारा लागतो. आणि भिंती लागतात केवढ्याला !' टिल्ल्यानं आणखी माहिती पुरवली. खरं तर त्याला दिसली होती चंदूच्या बागेतली जाईची फुलं, गुलाबाची झाडं अन् कुंपणाची भिंत. पण टिल्ल्या होता छोटा;

आणि वरवर जात होता. म्हणून त्याला सगळंच मोठंमोठं दिसत होतं.

'हॅलो, अरे बापरे! मी अगदी चंद्राजवळ पोचलोय; हॅलो! (टिल्ल्या कुंपणाच्या भिंतीवरच्या गोल दिव्याजवळ गेला होता!) बापरे! किती मोठा आहे हा चंद्र! अन् गोल गोलः गुळगुळीत आहे, काचेसारखा दिसतोय. त्याच्या आतून प्रकाश येतोय, केवढा तरी मोठा प्रकाश आहे हा! छे छे, माझे डोळे अगदी दिपून गेले. मला काहीएक दिसत नाहीये! हॅलो, माझं यान चंद्रावर पोचलं, मी चंद्रावर उतरलो.'

दिव्याभोवती दोऱ्याचं वेटोळं अडकलं अन् फुगा वरवर जायचा थांबला. टिल्ल्याचा मुक्काम चंद्रावर झाला. टिल्ल्या चंद्रावर हिंडू फिरू लागला. एव्हाना दिव्याची काच थोडी तापली होती. टिल्ल्याचे पाय अन् शेपटी थोडी थोडी भाजू लागली. तरी टिल्ल्या आपला फिरतच होता.

पण दिव्याची काच होती गोलगोल, गुळगुळीत. टिल्ल्याला काही 'चंद्रावरनं' पृथ्वीवर येता येईना. तो बसला तिथंच. दमला, त्याला झोप यायला लागली.

एवढ्यात रात्रीचे दहा वाजले. झोपायला जाताना चंदूच्या बाबांनी दिवा घालवून टाकला.

आणि दमलेल्या टिल्ल्याला 'चंद्रावर'च गाढ गाढ झोप लागली. स्वप्नसुद्धा पडली नाहीत त्याला.

सकाळी टिल्ल्या उठला तर चंद्र विझलेला होता. तो आता नुसताच गोल अन् गुळगुळीत दिसत होता! अन् त्याच्या आतून चांदणंही येत नव्हतं.

टिल्ल्या चांगला जागा झाला. त्यानं इकडे तिकडे पाहिलं, थंडगार चंद्रावर आपण झोपलो आहो आणि आपलं 'यान' एका झाडावर अडकलं आहे असं त्याला दिसलं.

आणि जवळची भिंतदेखील दिसली. तो भिंतीवरनं तुरुतुरुतुरु खाली उतरला आणि लगबगीनं आपल्या आईबाबांकडे गेला.

आता टिल्ल्याची आई सगळ्यांना कौतुकानं सांगते, 'आमचा टिल्ल्या किनई, भारी चपळ हो. सारखा धावत असतो. मेल्याला मुळी एका जागी बसवतच नाही. अहो, परवा किनई, अगदी चंद्रावर देखील जाऊन आला हो!' अन् टिल्ल्या हसतो – अगदी खूष खूष होऊन!

वा. क्र.
विषय

१४

# फौजदाऱ्याची गोष्ट

'कुकूऽऽच कूऽऽऽ' पाटीलबाबांच्या 'फौजदाऱ्या' नं एक छोटीशी बांग दिली.

झुंजूमुंजू व्हायला लागलं. क्षितिजाच्या कडा उजळायला लागल्या. चांदण्या फिक्या व्हायला लागल्या. चंद्राची कोर पश्चिमेच्या आकाशात बुडायला आली.

कुठूनशी तरी एक वाऱ्याची झुळूक उठली. हलक्या पावलांनी फिरायला लागली. संथ तळाच्या पाण्यावर तिनं लाटांची रांगोळी काढली. झोपेत असलेल्या झाडांच्या केसांत अलगद बोट खुपसून तिनं त्याची झोप मोडायला सुरुवात केली. घरट्यांत निवांत झोपलेल्या पाखरांच्या पिसांची घडी मोडली. पाटलांच्या दाराच्या लिंबाच्या पानांची तोरणं सळसळवीत तिनं पाटलाच्या वाड्याच्या

भिकाशी झोपलेल्या फौजदाराच्या पिसाऱ्यात फुंकर मारली.

तशी चाचपडत फौजदाऱ्या जागा झाला. त्यानं डोळे उघडून जिकडे तिकडे पाहून घेतलं. पहाट व्हायची लक्षणं त्याला दिसली. तशी त्यानं पिसारा झटकून नीट केला. मान ताठ केली. डोक्या-वरच्या जास्वंदीच्या पाकळ्या नीट केल्या आणि वर बघून चोच उघडली, गळा नीट चालू आहे ना बघायला थोडं 'खुर्रक खुर्रक' केलं आणि सरावाची म्हणून पहिली बांग ठोकली. 'कु कूऽऽ च कूऽऽ' आणि सभोवताली पाहिलं मान मुरडून.

पण तेवढ्यानं फारशी कुठं हालचाल दिसेना, तशी घसा साफ करून, मान आणखी उंच करून त्यानं जोरात आरोळी दिली, 'को को कोऽऽ कोऽ' उठा रेऽ उठाऽऽऽ!

'अग बाई, पहाट झाली वाटतं.' म्हणत लेलेआजी उठल्या अन् 'उठा प्राप्त:काळ झाला, आत्माराम पाहू चला' म्हणत सडा-रांगोळी करायला लागल्या.

लोहाराची व्हंजी उठली. अन् डोक्यावर हंडा, हंड्यावर कळशी, कळशीवर तांब्या ठेवून लगालगा पाण्याला निघाली.

'दीस उजाडला वाटतं ऽऽ' म्हणत आळोखेपिळोखे देत पाट-लाचे गडी उठले, त्यांनी बैलांपुढे टाकायला वैरण कापायला सुरु-वात केली. 'खट् खट् खट्.'

तो आवाज ऐकून पाटलाच्या गोठ्यातली गाई-बैलं उठून उभी राहिली, त्यांच्या गळ्यातल्या घुंगरमाळांचा आवाज झाला 'खळ् खळ् खळ्.'

गोठ्यातली हालचाल ऐकून पाटलीणबाई उठल्या, पाटील-बाबा उठले, मुलं-माणसं जागी झाली, हासू-बोलू लागली. तेव-ढ्यातच सूर्याचा लाल–लाल गोळाही वर आला.

कोंबड्या आपल्या पिलावळीला घेऊनं क्लकक्लकू लागल्या. आभाळात पाखरांचे थवे चाऱ्यासाठी उडू लागले. शेतकरी शेतावर, लोहार भात्यावर, तेली घाण्यावर अशी कामं सुरू झाली. गाव जागा झाला, कामाला लागला.

फौजदाऱ्या उकिरड्यावर उंच जागी उभा राहून हे पाहात होता. सारी कशी कशी करतायत ते बघून घेत होता. त्याच्या डोक्यात काय काय येत होतं. पण तो ते बोलला नाही. मनातल्या मनातच ठेवलं सारं.

दुसऱ्या दिवशीही फौजदाऱ्यानं बांग दिली आणि काय काय होतंय ते बघून घेतलं.

आणि तिसऱ्या दिवशीही.

तिसऱ्या दिवशी रात्री मात्र त्याला बराच वेळ झोप लागेना. 'फुकट फुक्कट गेलं माझं आयुष्य. रोज रोज साऱ्यांच्या आधी उठायचं, घसा खरडायचा, सगळ्यांना जागं करायचं, कामाला लावायचं, असं केलं साऱ्या जन्मभर. मी ओरडलो तर पहाट होणार, मी ओरडलो तर सूर्य उगवणार, लोक कामाला लागणार, धान्य पिकविणार, कापडं विणणार, पाणी पिणार, दूध-तूप खाणार. माझ्यावर सगळं जग अवलंबून. पण मी राहातोय कुठं ? तर या कचऱ्याच्या ढिगावर, या घाणेरड्या कोंबड्या अन् त्यांच्या पिलांबरोबर ! अन् खातोय काय ? तर केरातले दाणे ! तेदेखील मिळाले तर. नाहीतर उप्पाशी आपला ! '

कोंबडेदादाला अशा विचारानं कितीतरी वेळ झोप लागली नाही. दुसऱ्या दिवशी पहाटे त्याची बांगदेखील नीटशी खणखणीत आली नाही ! त्याचं उकिरडा उचकण्यातही मन लागेना.

हळूहळू सकाळ झाली. पाटलाच्या ओटीवर गावकरी माणसं जमायला लागली. पाटीलबुवा आंघोळ करून गंधबिंध लावून बैठकीवर लोडापाशी बसले, सगळ्यांची गाऱ्हाणी ऐकू लागले, भांडणं सोडवू लागले, निवाडे देऊ लागले.

तशी एकेक पाय डौलात टाकत फौजदाऱ्याही वाड्याच्या दरवाजातनं अंगणात आला. भराभरा पायऱ्या चढत बैठकीवर आला अन् पाटीलबुवांच्या अगदी समोर जाऊन तोऱ्यात उभा राहिला.



'काय फौजदार, आज इकडं कुणीकडे येणं केलं ? दाणापाणी समदं मिळतंय नव्हं ?' पाटलांनी हसून विचारलं.

'होय, मिळतंय, पण उकिरडा तुडवावा तेव्हा दिवसभर !' फौजदार कुर्यानं म्हणाला.

'च्च्च् !' ओटीवरल्या सगळ्यांनी माना हलविल्या पण त्यांना गालातल्या गालात हसू फुटत होतंच.

'मी रोज सगळ्यांच्या आधी उठतो. घसा फोडून ओरडतो म्हणून पहाट होते. होय ना ?' कोंबड्यानं सगळ्या सभेला जोरात विचारलं.

'होय होय !' सगळे म्हणाले.

'मी ओरडतो म्हणून सूर्य उगवतो. कबूल ? ' फौजदार.

'होय होय !' – सगळी सभा.

'मी ओरडतो म्हणून तुम्ही उठता, कामाला लागता, धान्य पिकविता, जिवंत राहाता. होय ना ? '

सगळ्यांनी माना डोलाविल्या.

'अन् मी खायचं काय, तर उकिरड्यावरचे दाणे ! तेही सापडले तर ! काय वागणं हे तुमचं ?' फौजदार गुरकावला.

'चुकलो चुकलो ! ' पाटलांनी दोन्ही गालांवर चापट्या मारून घेतल्या आणि लगेचच एका पितळेच्या डब्यात फौजदारासाठी जोंधळे भरून ठेवायला गड्याला हूकूम दिला.

फौजदाऱ्या ऐटीत खाली उतरला, उकिरड्यापाशी गेला. कोंबड्या अन् त्यांची पिलं दाणे खात होत्या ते बघत उभा राहिला. तो काही दाणे टिपेना. तशी कोंबड्या व पिलं त्याच्याकडे आश्चर्यानं पाहू लागली. तशी ती बघताहेत तोवर फौजदार पाटलाच्या वाड्यात गेला अन् डब्यातले पोटभर दाणे खाऊन आला !

बघता बघता फौजदार टम्म फुगायला लागला. रोज पहाटे उठून बांग द्यायची अन् मग चाहील तितकं खायचं असा त्याचा उद्योग सुरू झाला. उकिरड्यावरचे दाणे खाल्ले नाहीत तरी

दिवसभर त्याच्या आसपासच हिंडावं लागे त्याला. झोपायचंही असंच कुठं भिंतीवळचणीला !

फौजदाऱ्याच्या मनात पुन्हा किल्मिष आलं. तो एके दिवशी पाटलाच्या दरबारात जाऊन उभा राहिला तोऱ्यात !

‘ काय फौजदार, तब्येत तर छान दिसतीय. आज काय तक्रार आणलीय ? ’ पाटीलबुवांनी विचारलं.

‘ होय, तब्बेत छान आहे. उकिरड्यावरचं खायला लागत नाही तुमच्या कृपेनं. पण राहातोय अजून उकिरड्यावरच ! ’ फौजदार चिडून म्हणाला.

‘ अरेरे ! ’ सभेनं मान डोलावली. (पण ती गालातल्या गालात हसली.)

‘ मी ओरडतो म्हणून पहाट होते. मी ओरडतो म्हणून सूर्य उगवतो. मी ओरडतो म्हणून तुमचं सगळं चालतं अन् मी राहायचं कुठं, तर उकिरड्यावर, नाहीतर अंगणात ! हा काय न्याय झाला ?’ फौजदार त्वेषानं म्हणाला.

‘ छे छे ! पण मग कसं करावं ? तुझं म्हणणं तरी काय फौजदारा ?’ पाटलानं विचारलं.

‘ मला असा वाडा हवा. तुमच्यासारखा चौसोपी ! ’ तावडतोव-फौजदारानं मन मोकळं केलं.

‘ बरं बरं, एवढंच ना ? बांधून टाकू. ’ पाटील म्हणाले, अन् त्यानं कुंभारा-गवंड्यांना फौजदारासाठी चौसोपी वाडा बांधून द्यायला सांगितलं.

हां हां म्हणता वाडा उभा राहिला. माळा-तोरणं लावून

वाजंत्री वाजवून कोंबडा त्यात राहायला गेला. वाड्यात पोतीच्या पोती जोंधळे. आता कोंबड्या अन् पिलं त्याच्या जवळदेखील येत नाहीशी झाली.

पाटलाला होती एक लेक. गोरीगोमटी, नक्षत्रासारखी सुंदर. लेक मोठी झाली होती. तिला ठिकठिकाणच्या मागण्या येत होत्या. आता फौजदाराला काही उद्योग नव्हता. आपल्या ओटीवर बसून तो ती ये-जा पाहात होता. त्याच्या मनात काय काय येत होतं.

मनातलं मनात साठेना, तशी तो एक दिवस पाटलाच्या सभेत गेला. पाटलाला म्हणाला—

'पाटीलबुवा, तुमची लेक आता लग्नाची झालीय. तिच्यासाठी तुम्हीं सोयरिकी बघताय. खूप लांबलांबच्या माणसांशी बोलताय. पण समोरच असलेला मी तुम्हाला दिसलो नाही काय ?'

'खरंच की– चुकलो चुकलो, फौजदारसाहेब तुम्हालाच देतो मी लेक आपली !' पाटीलबुवा म्हणाले अन् जोरात लग्नाच्या तयारीला लागले.

फौजदाराचं लग्न ते. थाटामाटात झालं. चार दिवस गावजेवणं झडली. नवरी फौजदाराकडे नांदायला आली.

दुसऱ्या दिवशी पहाट झाली तशी फौजदार ओरडला, 'कुकूच कूऽकूऽऽ' आपण ओरडलो आता आपली बायकोही ओरडेल म्हणून तिच्याकडे बघू लागला. पण पाटलाची लेक आपली कूस बदलून झोपी गेली. फौजदाराला मोठा राग आला.

असं रोज रोज व्हायला लागलं. फौजदाराला वाटे आपल्या बायकोनं आपल्यासारखं आरवावं, आपल्यासारखे कच्चे जोंधळे

खावे. पण ती काही ऐकेना. फौजदार रागवायला लागला. तीही पाटलाचीच लेक. तीही बरोबरीनं भांडायची.

एका रात्री दोघं इतकी भांडली, इतकी भांडली की कोंबडा खूप चिडला. उपाशीच जमिनीवर झोपून गेला.

पाटलाची लेक, पलंगावर झोपणार इतक्यात तिला जमिनीवर झोपलेला नवरा दिसला. त्याला तसाच झोपलेला पाहून ती कळवळली. त्याला थंडी वाजू नये म्हणून तिनं त्याच्या अंगावर एकावर एक दोन कांबळी टाकली. फौजदार त्यात पुरता बुडून गेला.

दुसऱ्या दिवशी फौजदार जागा होतो अन् त्या पांघरुणातून बाहेर येऊन बघतो तो काय? सकाळ चांगली उजाडली होती, उन्हं अंगणात आली होती, सारं जग कामाला लागलं होतं.

'अरेच्या! मी ओरडलो नाही तरी आज उजाडलं अं!' तो स्वतःशीच म्हणाला. पण त्यानं परीक्षा पाहायचं ठरविलं. आणखी दोन पहाटे तो असाच लौकर उठला, पण आरवला मात्र नाही मुद्दामच. तरी पहाट झाली, लोक उठले, कामाला लागले. कोणी म्हणालंदेखील नाही की आज तीन दिवस फौजदाऱ्या का बरं ओरडला नाही!

फौजदार मनातून सारं उमगला आणि निमूटपणे पूर्वीसारखा पाटलाच्या अंगणात राहायला लागला! रोज पहाटे खणखणून बांग द्यायचं मात्र त्यानं सोडलं नाही.

BVBK-0401972

9९०२